(उरला भेद न ज्या कांहीं• या चालीवर.)

किति हे निर्दय ऋषि गमती ॥ घोर तीं कर्में करवीती ॥ ध्रु०
जीची कांति सुवर्णाची ॥ लोपलि दीप्ति मेनिकेची ॥
कटिही भासे केसरीची ॥ होते तृप्ति या नेत्रांची ॥
अतर्क्य करणि विधात्याची ॥ निर्मिली मूर्ती त्या रतिची ॥
चाल ॥ अशा स्त्रियेसी ॥ कामिं लाविती ॥ स्नेह नसे चि-
त्तीं ॥ पाषाण हृदयी मज गमती ॥ १ ॥

मंजु०_ सखे वसंतसुंदरे, अतिथी महाराजांस त्याचा वृत्तांत वि-चाराचा असें माझे मनांत वारंवार येतें पण बाई परकी-मनुष्यास एकदम विचारण्यास धीर होत नाहीं.

वसंत०_ सखे, अतिथींचा आदरसत्कार आपणास केला पाहिजे तेव्हां अबोल्यानें त्यांचा सत्कार यथास्थित कसा होईल.

रत्न०_ परमेश्वरा, मजवर कृपा करून या माझ्या सख्यांस त्यांचा वृत्तांत विचारण्याची बुद्धि दे.

मधु०_ (मंजुळेस) गडे, मी अतिथींस त्यांचा सर्व वृत्तांत विचारितें.

रत्न०_ मना, तळमळ करूं नको, धीर धर. जें तुझ्या मनांत आहे तेंच परमेश्वर या माझ्या सख्यांकडून करवीत आहे.

मधु०_ महाराज, आपला वृत्तांत विचारण्याचें आमचे मनांत फार आहे; परंतु आम्ही वनांत रहाणाऱ्या असल्यामुळें आम्हास प्रापंचिक रीतरिवाज मुळींच ठाऊक नाहीं.

चंद्र०_ कांहीं चिंता नाहीं खुशाल विचारा.

वसंत०_ बोलण्यांत कदाचित् अमर्यादा होईल म्हणून भीति वाटते.

चंद्र०_ तसें कांहीं तुम्ही मनांत आणूं नका. तुम्हांस जें कांहीं मला विचारायाचें असेल तें खुशाल विचारा.

मधु०_ महाराज, (चंद्रमुखाकडे बोट करून) या देहास काय म्हणतात ? मातापित्याचें नांव काय ? रहाण्याचें ठिकाण कोणतें ? हें कृपा करून सांगावें ?

चंद्र०_ मला चंद्रमुख असें म्हणतात; माझ्या आईचें नांव सुशीला

बाई व पित्याचें नांव शौर्यसागर.

रत्न०— (आनंदयुक्त होऊन) बाबांनीं पूर्वी ज्या पुरुषाचें वर्णन केलें होतें तोच हा असावा. शाबास भारध्या! शाबास! जे शब्द ऐकण्याची इच्छा होती तेच ऐकलेस. बरें पुढें काय काय बोलणें होतें तें ऐकावें. (पुढें सरून बसते.)

मधु०— मग इकडे येण्याचें कारण काय घडलें.

चंद्र०— या रानांत राक्षसाचा उपद्रव फार झाल्यामुळें प्रजांची हांकाहांक कानीं आल्यामुळें राक्षसवधार्थ येणें झालें.

रत्न०— (मनांत) तो राक्षस नव्हे तर या चरणाचें दर्शन घडविणारा माझा मित्रच असें मी समजतें.

मधु०— मग पुढें !

चंद्र०— त्या राक्षसाचा नाश करून प्रजेस त्रासांतून मुक्त केलें आणि स्वनगराकडे जाऊं लागलों.

रत्न०— (मनांत) केवढा तरी बाई पराक्रम हा!

मधु०— नंतर स्वराज्यांत जाण्याचें सोडून इकडे येणें कसें झालें !

चंद्र०— अरण्यांत एक सुंदर हरीण माझे दृष्टिगोचर झाला तेव्हां त्या हरिणाचा पाटलाग करीत इकडे आलों.

रत्न०— (मनांत) त्या हरिणाचा मजवर अनंत उपकार आहेत.

मधु०— महाराज, आपला हा वृत्तांत ऐकून आम्हांला आपली एकप्रकारची आशा उत्पन्न झाली आहे. आपण आमच्या आश्रमांतील आतिथ्यसत्कार हें आमचें आपलेकडे मागणें आहे.

(इतक्यांत ऋषिशिष्य येतात व पडद्यांत)

ऋषि०— (मोठ्यानें) अग हे रत्नकांते, हे मंजुळे, अग तुम्ही आहां तरी कोठें ! तात जांगील गुरु रुद्रपुराहून आश्रमास आले. ते तुम्हांला बोलावताहेत करितां लवकर चला.

(सर्व मुली कान देऊन ऐकतात.)

मधु०— महाराज, तात घरीं आल्यामुळें आश्रमांत जाण्याविषयीं आपली आज्ञा मागतों.

चंद्र०— ठीक आहे.

(सर्व मुली निघून जातात.)

चंद्र०— (मनांत) मी इतका वेळ जो सुखार्णवांत पोहत होतों तो-एकदम या ऋषिपुत्रांच्या शद्बांच्या लाटांमुळें या अलभ्य सुखास अंतरलों. असो. आतां मी इथें एकटा बसून कितीही जरी खेद केला तरी माझें शांतवन कोणीही करणार नाहीं. मला फारच औदासिन्यत्व प्राप्त झालें आहे, करितां माझा मित्र त्या अशोक वृक्षाखालीं बसला असेल तिकडे जावें. तिकडे गेलें म्हणजे तरी घटिकाभर करमणूक झाली तर पाहूं. माझा तर त्या सुंदरीवांचून दुसरी स्त्री न करण्याचा निश्चय ठरलाच आहे.

रत्न०— (राजाकडे वक्रदृष्टीनें पहात पहात निघून जाते वेळीं राजास उद्देशून) अग सखे मंजुळे, पहा हा पारिजातक अगदीं पूर्ण दशेस आला. मला तर बाई असें झालें आहे कीं केव्हां एकदां ह्याला पुष्पें येतील आणि त्याची सुंदर माला माझ्या गळ्यांत पडेल.

चंद्र०— (ऐकल्याचा भाव दाखवून) काय ही त्या पारिजातकाची माला आपल्या गळ्यांत केव्हां पडेल म्हणते. मला वाटतें तिणें हें मलाच उद्देशून म्हटलें नसेल ना! (विचार करून) खरोखर तिणें हें मलाच उद्देशून म्हटलें असावें; परंतु असेंही आहे.

साकी.

कामिक पुरुषां अन्य स्त्री ती वाटे बोलत असतां ॥
उद्देशुनियां आपणासि ती वागे ऐसें दिसतां ॥
भास किं होत असे ॥ भेटिचा योगचि येत असे ॥

असो. आतां इकडे मी एकटा असल्यामुळें हा कामाग्नि मला ज़ास्त जाळील तर माझे मित्राचे भेटीस जावें हेंच बरें. (जातो.)

पडदा पडतो.

अंक तिसरा समाप्त.

अंक ४.

प्रवेश १.

अरण्यांतील शिबीर.

विदुषक.— (इकडे तिकडे पाहून) कां बरें माझा मित्र चंद्रमुख अजून येत नाहीं! त्यास जाऊन फार वेळ झाला. किती तरी याला हा शिकारीचा नाद! पहा नगरांतील नाना प्रकारचे विलास भोग भोगण्याचें सोडून अनेक तऱ्हेच्या हिंसक पशूंच्या तडाक्यांत या थंडींत येऊन पडला आहे. आतां हा नगरास केव्हां परत जाईल तेव्हां जावो. इकडे तो एका ऋषिकन्येच्या स्वरुपास भुलून जाऊन अगदीं भांबावून गेला आहे. सारांश प्रारब्ध माझें! कुठली अक्क मारली आणि याच्याबरोबर मी आलों. (आपणच आपल्या तोंडावर मारून घेतो आणि खालीं मान घालून बसतो. इतक्यांत चंद्रमुख प्रवेश करितो.)

चंद्र.— कसें काय मित्रा, असा खालीं मान घालून कां बसलास? तुला कसली काळजी लागली आहे?

विदु.— हें बघ, भूतलावर दुष्काळ कोणापासून पडतो?

चंद्र.— अरे विचारतोस काय? मेघापासून.

विदु.— हें खरें ना! तर मग मलाही काळजी तुझेपासूनच उत्पन्न झाली.

चंद्र.— कशी रे बाबा!

विदु.— तुला काय सांगूं! या अरण्यांत तूं आणखी चार दिवस राहिलास तर आमची समाप्ति बहुतकरून येथेंच होते. अरे, तुला कसें या घोर अरण्यांत रहाणें रुचत असेल तें असो. माझ्याच्यानें तर आतां एक क्षणभरसुद्धां रहावत नाहीं. हीं पहा हाडें बाहेर पडून सुदामजी बनलों आहें.

चंद्र.— समजलों. मित्रा, तूं नगरांत जाण्याविषयीं उत्कंठित झाला आहेस. चिंता नाहीं, लवकरच तुझी रवानगी करून देतों; तूं कांहीं काळजी करूं नको. पण हें बघ गड्या, तूं इकडे येऊन नेत्रानें पहाण्यास योग्य अशी व्यक्ति पाहिली नाहींस.

विदु० काय म्हणतोस! या अरण्यांत तूं स्तुति करितोस अशी वस्तु कोणती आहे तें ठाऊक नाहीं. मला तर इकडे कांहीं एकरुचत नाहीं, सर्व उदास दिसतें.

चंद्र० या ठिकाणीं ऋषि रहातात त्यांत जांगील ऋषि म्हणून कोणी आहे.

विदु० होय तें मला ऐकून ठाऊक आहे.

चंद्र० त्यास एक दिव्य स्वरुपी रत्नकांता या नांवाची कन्या आहे.

विदु० (कपाळावर हात मारून) जें मीं आजपर्यंत चोंकीत होतों तें हा आपल्या तोंडानें सांगतो. लोकांत जी म्हण आहे ती काय खोटी नाहीं; कीं एकदां कानावरती आलेली गोष्ट बहुधा खोटी होत नाहीं. (चंद्रमुखास) होय आहे मग?

चंद्र० मित्रा, तुला काय सांगूं! त्या स्त्रियेच्या स्वरुपाचें वर्णन माझ्यानें तर होणार नाहींच परंतु साक्षात् ब्रम्हदेवानें जरी ती - स्त्री उत्पन्न केली आहे तरी त्याच्यानेंही तिचें वर्णन करवणार नाहीं; असें तिचें अप्रतिम लावण्य आहे.

पद-

(वक्त्र बंद हा दिव कशाचा या चालीवर.)

सुवर्ण केतकिपरि वर्णा तियेचा बांधासडपातळ जीचा ॥
नाजुक कांती मृगनेत्री ती गर्व गळाला रंभेचा ॥
मुखचंद्रातें बघुनि चंद्र तो लज्जित होतो मनिं साचा ॥
वेणि पाहुनी भुजंग पाहे मार्ग आपुल्या विवराचा ॥
पायांची त्या कांति मह्यालां वाटे उदय चंद्राचा ॥
कंबर जीची सिंहकटीवत भाग्य उदय या नेत्रांचा ॥ सुवर्ण० ॥

विदु० आतां हे महाराज पुरे नादग्रस्त झाले, यास कोणत्याही उपायानें ताळ्यावर आणिलें पाहिजे. गड्या, तूं तिच्या सौंदर्याचें जसें वर्णन केलेंस तशी जरी ती स्त्री असली तरी तिकडे आपण लक्ष्य देऊं नये. कारण किती झालें तरी ती रानांत रहाणाऱ्या पशूप्रमाणें आहे, व तूं राजपुत्र आहेस. अरे, कैक सुंदर अप्सरे सारख्या स्त्रिया तुझे पायांकडे चालत येतील यास्तव तूं त्या स्त्रीच्या नादीं लागूं नको हें माझें तुला फार फार सांगणें आहे.

चंद्र०— मित्रा, मी तर निश्चयच केला आहे कीं त्या स्त्रियेचा उपभोग घे-तल्यावांचून नगरास जाणारच नाहीं. आणि जर तसें झालें नाहीं तर सन्यास घेऊन क्षेत्रवास करून राहीन. पण ही गोष्ट वाड्यांत बोलूं नको हो.

विदु०— याचा तर हा कड्डा निश्चय दिसतो.

(ऋषिकुमार प्रवेश करितात.)

राजदूत.— महाराज, कोणी जांगील या नांवचे ऋषीकडून शिष्य आ-ले आहेत. आज्ञा होईल तर आंत घेऊन येतों.

चंद्र०— काय म्हणतोस? सद्गुरु जांगील ऋषींकडून शिष्य आले आहे-त! तर त्यांस आंत घेऊन ये.

(राजदूत पडद्यांत जाऊन ऋषिकुमारांसह परत येतो.)

शरथ:— राजा, तुझी लीन वृत्ति पाहून आम्ही संतुष्ट झालों. तुला-आशिर्वाद देतों हा ग्रहण कर.

साकी.

सुंदर ललना चक्रवर्ति सुत पुज्यमान तूं होसी ॥

हेमंत:—

पुत्रापोटीं सुपुत्र होउनि सत्कर्मीं बहु जडसी ॥

वसंत:—

भोगिसि सर्व सुखें ॥ पळती दीगांतीं दुःखें ॥

चंद्र०— महाराज, आपला आशिर्वाद असल्यावर सर्व कांहीं होईल.

शरथ:— राजा, तूं या अरण्यांत आल्याचें ऐकून सद्गुरु जांगील ऋषींनीं हिंसक पशूंच्या उपद्रवापासून मुक्त केल्याबद्दल आभार मानून हा तीर्थ प्रसाद दिला आहे तो घे.

चंद्र०— सद्गुरूंची आज्ञा मला शिरसामान्य आहे.

(ऋषिशिष्य राजाचा निरोप घेऊन गमन करितात.)

चंद्र०— मित्रा, चल आतां आश्रमाकडे जाऊं.

विदु०— चल बाबा, नेत्रील तिकडे जाणें प्राप्त आहे. (चहूंकडे पा-हिल्यासें करून चंद्रमुखास) मित्रा, इकडे पहा, या सुवर्णत-लावाच्या कांठीं कोणी ऋषिकन्या बोलत बसल्या आहेत.

चंद्र०— (पाहून) खरेंच गड्या, मी जाऊन त्यांशें काय भाषण चा-

लेलें आहे तें झाडाआड उभें राहून ऐकतों. मी जाऊन येईपर्यंत तूं या वटवृक्षाखालीं बैस.

विदु०— बरें बाबा. तूं मात्र लवकर ये म्हणजे झालें.

(चंद्रमुख सुवर्णतलावानजीक झाडाआड उभा रहातो.)

प्रवेश २.

(रत्नकांता पल्लव शय्येवर शयन करते व तिच्या सख्या मंजुळा, मधुमोगरी व वसंतसुंदरी ताडाच्या पंख्यानें वारा घालितात.)

मंजुळा:— गडे रत्नकांते, आम्ही तुला सरोवराच्या कांठीं या सुंदर पल्लव शय्येवर निजवून ताडाच्या पंख्यानें वारा घालीत आहों यापेक्षां तुला कांहीं बरें वाटतें काय?

रत्न०— (डोळे उघडून पुनः निजते.)

मधु०— (रत्नकांतेच्या डोळ्यांस तीर्थ लावून) अग, बाबांनीं आज तुझेसाठीं हा प्रसाद दिला आहे हा घे.

मंजु०— अग, तिचा डोळा लागला आहेसा दिसतो.

रत्न०— (निद्रेंतच) सख्यांनों, आतां तुमची व माझी हीच शेवटची भेट.

मंजु०— (दचकून) ही अशी काय बरें बडबडते!

मधु०— थांब ग, ही पुढें काय बोलते तें ऐकूं.

रत्न०— (निद्रेंतच) बाबा, तुम्ही मला पुनः या आश्रमांत कधीं आणाल बरें!

मंजु०— हिच्या बोलण्याचा भावार्थ काय असावा? मला असें वाटतें कीं जेव्हां चंद्रमुख महाराजास हिनें पाहिलें तेव्हांपासून हिची प्रकृति कांहीं कांहीं नादुरुस्त होत चालली आहे.

मधु०— मलाही असेंच वाटतें. परंतु यास उपाय काय करावा? माझे मतें ही गोष्ट बाबांच्या कानावर घालावी म्हणजे बरें.

वसंत०— छे छे. आधीं रत्नकांतेस प्रकृति नादुरुस्त होण्याचें कारण विचारावें, मग तिच्याच विचारानें काय करणें तें करूं.

मंजु०— होय असें करूं. (हलवून रत्नकांतेस उठवितें.)

रत्न०— (त्रासानें) काय बरें मला जरा डोळा लागला होता तो सुद्धां

तुमच्च्यानें पहावत नाहींसा झाला ना?

मंजु०— गडे रत्नकांते, तुझी प्रकृति दुरुस्त नसल्यामुळें आम्हां सर्वत्रांस रात्रंदिवस चैन पडेनासें झालें आहे. तुझ्या दुखण्याचें कारण तुला विचारावें असें आमचे मनांत आल्यावरून तुला जाग्रत केलें; आतां मी तुला विचारितों तें खरें सांग. तुला दिवसेंदिवस अगदींच सुखास पडेनासें झालें याचें कारण काय?

वसंत०— तुला या शीतळ हवेनें तरी कांहीं बरें वाटतें काय?

रत्नका०— (हळुच) रोगाला जर योग्य औषध मिळेल तरच गुण येईल.

मंजु०— सखे, अशा मोघम बोलण्यानें आम्हीं काय समजावें? काय असेल तें उघड सांग.

रत्न०— मला जो रोग आहे तो सांगण्यास मला बाई लाज वाटते.

मंजु०— अग वेडे, आमचे सांगण्यास तुला कसली लाज सांग? तूं जर आपल्या दुखण्याचें खरें कारण सांगितलेंस तर त्यास कांहीं तरी उपाय करितां येईल.

रत्न०— सख्यांनो, तुम्हांला माझे दुखण्याचें काय बरें कारण असावेंसें वाटतें?

मंजु०— गडे, आम्हांला असें वाटतें कीं, तुझ्या दुखण्याचें कारण तुला तुझ्या या नवयौवनभरांत त्या दुष्ट मदनरोगानें गांठल्यामुळें तुझी ही अशी दशा झाली असावी.

रत्न०— सखे,

पद-

(बाडवडीलां • या चालीवर.)

काय सांगूं तूतें मंजुळा बाई ॥ मदनानें मजवर केलि चढाई ॥ध्रु०
निष्ठूर करितो शरिराची लाही ॥ गरगर घेरी येतसे पाहीं ॥
पांचही बाण टोंचितो हृदयीं ॥ साहूं कशी मी दुःसह होई ॥
मांडिलि त्यापें मजशीं लढाई ॥ तोड करूनी परतुनि देई ॥ काय० ॥

चंद्र०— सखे, त्या दुष्टानें तुझीच अशी दशा केली असें नाहीं. त्या चांडाळानें माझासुद्धां असाच पिच्छा पुरविला आहे.

मधु०— (मंजुळेस) यास आतां उपाय काय योजावा बरें? याची कांहीं

तरी तोड केल्यावांचून या आमच्या सखेची धडगत कांहीं-
दिसत नाहीं.

मंजु०— खरेंच बाई, रत्नकांतेकडे पाहिलें म्हणजे तिच्या देहाच्या-
हाडांचा पांजरा दिसतो फक्त तोंडावरच्या टवटवीवरून मात्रही
रत्नकांता असें ओळखावें अशी हिची अवस्था झाली आहे.

मधु०— मला वाटतें त्या दुष्ट मदनाचा नाश करण्यास एक चंद्रमुख-
महाराजच धनवंतरी योग्य आहेत, दुसरा उपयोगी नाहीं.

रत्न०— गड्यानों, माझी जर तुम्हांस आशा असेल तर जलदी करून
त्यांची व माझी लवकर गांठ घाला; नाहीं तर माझी आशा सोडून
स्वस्थ असा.

मधु०— चल वेडे, असें कांहींच्या कांहीं मुखांतून भाषण करूं नये.

मंजु०— बायांनों, ह्या आमच्या सखीचे हेतु पूर्ण करण्यास मला ए-
क युक्ति सुचली आहे.

मधु०— (पुढें सरून) सांग सांग पाहूं तुला काय युक्तिसुचली आ-
हे ती?

मंजु०— हें बघा, ज्या वेळेपासून चंद्रमुख महाराज दीर्घनेत्राचा ना-
श करून ह्या आपल्या आश्रमाजवळील अरण्यांत रहात आहे-
त त्या वेळेपासून आजपर्यंत बाबांकडून दर रोज त्यांना तीर्थ-
प्रसाद जात असतो तेव्हां आपण असें करावें.

मधु०— कसं करावं बाई?

मंजु०— या आमच्या सखीकडून (रत्नकांतेकडे बोट करून) चंद्र-
मुख महाराजांच्या नांवानें एक विनंती पत्र लिहावें. आणि
तें पत्र त्यांस प्रसादांतून पोंचतें करावें म्हणजे झालें.

मधु०— मला ही युक्ति फार पसंत वाटली.

मंजु०— सर्व खरें परंतु पत्र पोंचतें करण्याचें काम करतो कोण?

वसंत०— याजबद्दल तुम्ही कांहीं काळजी करूं नका. चंद्रमुख-
महाराजांकडे पत्र पोंचतें करण्याचें काम मी करितें.

मधु०— हें काम जर तूं केलेंस तर मग काय फारच चांगलें.

मंजु०— गडे रत्नकांते, आतां मनांतील भीड एकीकडे ठेवून चंद्रमुख म-
हाराजांच्या नांवानें एक विनंतीपत्र तयार कर पाहूं.

रत्न०— (लाजून) हें काय बाई , माझी तुम्ही सारी थट्टाच मांडिलीआहे.

मंजु०— अग , थट्टा कसली ? मी सांगतें तसें पत्र लिहून दे म्हणजे — झालें.

रत्न०— तुम्ही सांगतां तर लिहितें बाई. परंतु पत्र कसें लिहावें याची पद्धति मला माहित नसल्यामुळें त्यांस वाईट वाटून एखादा भलताच प्रकार होईल म्हणून भीति वाटते.

मधु०— अग लिही तूं , त्यांत वाईट वाटण्याचें काय आहे ?

रत्न०— परंतु पत्र कशानें कशावरती लिहूं ?

मधु०— अग हीं पहा शेजारीं कोंवळीं कोंवळीं कर्दळीचीं पर्णे आहेत यावर तुझ्या त्या सुंदर नखानें लिही म्हणजे झालें.

(मंजुळा कर्दळीचीं पानें आणून देते.)

रत्न०— (कर्दळीपत्र घेऊन पत्र लिहिण्यास आरंभ करिते.)

पद.

(असतांना यतिसन्निध किंचित सुख वाटतें या चाली.)

तव विरहें व्याकुळ मी सोडीव यांतून मला ॥
मज क्षणही चैन नसे कधीं जिव ऊरला ॥ चाल ॥
मदन झराझर बाण हा सोडी न सोसवे तो मार ॥
येउनि सत्वर भेट देउनी गार तयासी करा ॥
गांजिलें बहुत मला ॥ तव विरहें० ॥

मधु०— वाः ! ही आमची सखी पत्र लिहिणार फार हुशार आहे.

वसंत०— खरेंच बाई , ही म्हणते अशा प्रकारच्या मजकुराची अशी जुळवाजुळव करून असें पत्र लिहील असें मुळींच वाटलें नव्हतें. (रत्नकांतेची पाठ थोपटून) वाहवा ग भोळी !

मंजु०— असो. पत्र तर उत्तम आहे ; मात्र हें एकदां पोंचतें झालें पाहिजे.

मधु०— गडे रत्नकांते , चल आतां ऊठ पाहूं लवकर. पुढील काम उरकलें पाहिजे.

रत्न०— चला बायानों , (असें म्हणून हात टेंकून उठते.)

(रत्नकांता , मंजुळा , मधुमोगरी व वसंतसुंदरी जातात.)

प्रवेश ३.

(चंद्रमुख एकटाच मोतीतलावाचे तिरावर उभा रहातो. ऋषिकन्या मोतीतलावाचे कांठीं रत्नकांतेस पल्लव शय्येवर निजवून शीतलोपचार करीत आहेत.)

चंद्र० — (ऋषिकन्यांकडे पाहून त्यांच्या नवळच्या झाडीआड लपून रहातो.) माझें मन या स्त्रीच्या मुखचंद्राकडे वेधून गेलें असल्यामुळें तिच्याशिवाय मला कांहींच दिसेनासें झालें आहे. मला आज किती एक दिवस अन्नसुद्धां नकोसें होऊन गेलें आहे. (शरिराकडे पाहून) काय ही माझी दशा होऊन गेली आहे! जेव्हां जेव्हां मी आश्रमांत असतों तेव्हां तेव्हां माझ्यासमोर ती ऋषिकन्या उभीच आहे कीं काय असें मला वाटतें. (थांबून) काय तो प्रसंग ! ज्या वेळीं त्या तिच्या सख्या मजशीं बोलत होत्या त्या वेळीं ती मजकडे अशी टक लावून पहात होती;

पद.

(प्रिया मीनाक्षी, निशिदिनिं सेव निंदक्ष वचन. याचालीवर.)

सखी मंदगती ॥ प्रियजन लक्षुनि दक्षहृदयिं ममप्रीती ॥ स० चाल ॥ आनंदानें किंचित मुरडुनि ॥ गालिंच जी हंसती ॥ सखी मंद० ॥

आणखी पहा माझी काय विपरित स्थिति झाली आहे ती.

पद.

(दिसली पुनरपी गुप्त जहाली प्रिया सुभद्रा. या चालीवर.)

पहातां तियेसी तन्मयवृत्ती होउनि गुंग मी झालों किती ॥
शुद्धिहि माझी जाउनि मी हा वेडा बनलों निश्चिती ॥ ध्रु० ॥
मूर्ति तियेची नयनीं माझ्या बिंबुनि गेली नादवती ॥
सुंदरिचा त्या संग इच्छि मन त्याविण सुखें दुःखें दिसती ॥
पहातां० ॥ २ ॥
शीतळ वात अग्निज्वाळेपरि वाटे येत आंगावरती ॥
कोकिल रव कर्णासी माझ्या तप्त तैलवत लागती ॥ पहा० ॥ ३

(चंद्राकडे पाहून) या दुष्टानें तर मला तापवून फारच त्रास मांडिलेला आहे. हे चंद्रा, पहा मी चंद्रमुख आहें, तुझा सूड घेतल्यावां-

नून रहाणार नाहीं. (कांहींसी विरहमूर्च्छना आली म्हणून झाडास टेंकतो.)

मंजु०__ सखे, अशी इकडे पहा, कोणी पुरुष त्या अशोक वृक्षास टेंकून डोळे झांकून उभा आहे तो चंद्रमुख तर नसेल ना?

मधु०__ (पुढें सरून व डोकावलेंसें करून टाळी वाजविते.) गडे होय. ग होय, तोच चंद्रमुख. आतां हीच संधि पत्र नेऊन टाकण्यास फारच चांगली आहे.

मंजु०__ सखे वसंतसुंदरे, ज्या वेळीं पत्र पाठविण्याचा विचार ठरला त्या वेळीं तें पत्र पोंचविण्याचें काम तूं पतकरलेंस म्हणून हें पत्र नेऊन चंद्रमुखाकडे पोंचतें कर.

वसंत०__ (पत्र व ऋषीनें दिलेला तीर्थप्रसाद चंद्रमुखाचे पुढें ठेवून निघून येते.)

चंद्र०__ कां बरें मला अशी एकाएकीं मूर्च्छना आली? (तीर्थप्रसादाकडे पाहून) हा मजपुढें तीर्थप्रसाद कोणी आणून टांकला असावा? (प्रसाद हातांत घेतो.) अरे हें काय! यांत हें केळीच्या पानावर कोणी काय लिहिलें आहे! (पत्र वाचतो.) सखे, (गहिंवरून) तुझी अशी दशा झाली असें समजूं नको. पहा,

दिंडी.

छळितो तुजला मन्मथ सखे फार ॥
परि जाळीतो निष्ठुर मम शरीर ॥
विरहें तूझ्या चैन्य नसे मातें ॥
कसा नाहीं वीचार प्रिये तूतें ॥

(हातांत पत्र घेऊन फिरत फिरत ज्या ठिकाणीं ऋषिकन्या होत्या त्या ठिकाणीं येऊन अदृश्य उभा रहातो.)

रत्न०__ (राजाचें बोलणें ऐकलेंसें करून) अग बाई! शेवटीं हा दोष माझ्यावरतीच आला ना?

मंजु०__ सखे मधुमोगरे, पहा तरी ही आमची रत्नकांता त्या सुवर्णमालिनी वेलीकडे कशी टक लावून पहात आहे ती. तिला वाटतें त्या वेलीनें आपला प्रियपती जो बटमोगरा त्यास दृढालिंगन देऊन सुखी केले आहे तशी आपण केव्हां एकदां त्या राजास-

जाऊन भेटेन आणि त्याला आलिंगन देईन असें तिला होऊन गेलें आहे.

रत्न॰— सख्यांनों, तुम्ही या वेळीं मला पाहिजे तें जरी म्हटलें व कितीही तऱ्हेनें जरी लाजविलें तरी तें मला निमूटपणें सोसून घेतलेंच पाहिजे.

चंद्र॰— हिच्या सखीनें हिला काय म्हटलें? ती म्हणते जसें सुवर्णमालिनी वेलीनें आपला नवरा बटमोगरा यास आलिंगन दिलें तसें या माझ्या प्रियेच्या मनांतून मला आलिंगन द्यावयाचें आहे. (रत्नकांतेकडे पाहिलेंसें करून) या माझ्या प्रियेनें हें बोलणें ऐकून जो आनंद दर्शविला तेणेंकरून माझ्या या नेत्रांचें सार्थक झालें. आणखी हें खरेंच आहे कीं प्रत्येक तरुण पुरुषाला व स्त्रियांला अशा गोष्टींची नेहमीं आवड असते.

रत्न॰— प्रियसख्यांनों, माझ्याच्यानें आतां क्षणभरसुद्धांही विरहव्यथा सहन करवत नाहीं.

पद.

(चदजाउं कुणाला शरण करी जो हरण०या चाली०)

मी आहें तुम्हासी शरण करावें शमन या दुःखाचें ॥
मी धरितें चरण तुमचे ॥ अगसखये ॥ ध्रु०॥
मम तात जननि आप्त तीं सर्वही तुम्ही गुह्य मनिंचें ॥१॥
ठाऊक तुम्हां साचें ॥ अग सखये ॥२॥
गतप्राणवत मी सखे तयाविण चाळे व्यर्थ मनिंचे ॥
दाखवा चरण त्यांचे ॥ अग सखये ॥३॥

गडे, ही माझी कंचुकी फारच घट्ट होऊन मला अतिशय त्रास देते, गांठ जरा सोडून सईल कर पाहूं.

मधु॰— सखे, तुझी कंचुकी तुझ्या तारुण्याचे जोरानें क्षणोक्षणीं घट्ट होणार म्हणून तुझ्या चोळीची गांठ सोडण्याचें काम राजास सांग, आम्हांस सांगूं नको.

रत्न॰— काय बायांनों! तुम्ही आपली माझी सारी थट्टाच मांडिली आहे. तुमच्याकडे काय दोष! ज्याचें दुःख त्यासच माहित. सख्यांनों, मी जरी माझें तनमन त्यांचे चरणीं अर्पण केलें आणि तें अ-

र त्यांस रुचलें नाहीं तर काय उपयोग? सर्व फुकट. प्राणनाथ,

पद.

(प्रितिस पात्र कोण तुझ्या सांग जाहला या चाली.)

चरणिं योग्य म्हणुनि चित्त ठेविलें असे ॥
तुम्हांवीण कंठिं प्राण राहिला असे ॥ ध्रु.॥
तनमनधन अर्पियलें दान हें तुला ॥
मोहपाश टांकुनि कां गुतविलें मला ॥
चातकापरि ध्यास मला तुझाचि लागला ॥ चाल॥
पूर्ण करुनि कामशांति सौख्य दे कसें ॥ चरणिं.॥

(रत्नकांतेस मोहमूर्च्छना येऊन धरणीवर पडते. तिच्यासख्या आपल्या वस्त्रपल्लवानें तिला वारा घालतात व डोळ्यांस पाणी लाविता- त.)

चंद्र॰— (गडबडून) अरेरे! हा काय चमत्कार! प्रिये, मी विनोदानें येण्यास विलंब लाविला खरा परंतु तुझी अशी स्थिति होईल असें मला मुळींच वाटलें नव्हतें. (विचार करून) आतां आपण एकदम जाऊन प्रियेस वृदालिंगन देऊन सुखी करावें. परंतु असें- ही करणें उपयोगीं नाहीं; कारण तिच्या सख्या तिच्याजवळ असल्यामुळें आपण पुरुषांनीं एकदम जाणें हेंही अप्रशस्त दिसतें. असो. आपण जवळच झाडाआड आणखी कांहीं वेळ उभें रहावें आणि जर कदाचित् तसा कांहीं प्रसंग आला तर एकदम जाऊन प्रियेस भेटावें म्हणजे झालें.

रत्न॰— (सावध होऊन) सख्यांनों, जर त्यांची व माझी गांठ तुम्ही- आजचे दिवसांत घातलेत नाहीं तर माझी कांहीं धडगत दिसत नाहीं.

पद.

(किति सांगूं तुला मज चैन नसे या चालीवर.)

काय करूं मी सखे मज धीर नसे ॥ ध्रु.॥
हा विरह किती दुःख देत असे ॥
काम वैरी खरा मज भाजीतसे ॥
प्राणप्रीयाविणें हृदय फाटतसे ॥ चाल ॥

कसें तरि मी करूं कसा धीर धरूं मन आवरूं ॥ काय०॥१॥
मित्र म्हणुनी तुम्हा हस्त जोडीतसें ॥
प्राणाचीसाख्याची भेटइच्छितसें ॥
निर्दय होउं नका पदर पसरीतसें ॥ चाल ॥
मज नकोहा प्राण त्याविण आण वाहतें आण ॥ काय०॥२॥
म्हणून सख्यांनों, होईल तितकी जलदी करून त्यांची व माझी भेट लवकर करून द्या.

चंद्र०— अहाहा! प्रिये, तुझेवांचूनही माझी स्थिति फारच वाईट झाली आहे. पहा,

पद.

(जेव्हां जेव्हां वादायालें या चालीं.)

जेव्हां पाहिली तुज मी नयनीं ॥ धृतिहि माझी गेलि उडोनी ॥
भुललों सखये तुजलागोनी ॥ अमृत वाटे विषापरी ॥ धृ०॥
शुद्धीवरती नमनों कधिं मी ॥ गुंतले नयन तुझिया वदनीं ॥
मंजुळ तूझे शब्द ऐकुनी ॥ संतोषचि मजला ॥ जेव्हां०॥

मधु०— सखे रत्नकांते, तूं जर असा एकसारखा तोच ध्यास घरिलास तर कसें बरें होईल! कांहीं धीर धर; गडे, अशाप्रकारची गोष्ट करणें ती फारच विचारानें केली पाहिजे. यासाठीं कांहीं दम धर म्हणजे सर्व होईल.

रत्न०— सख्यानों, तुम्ही कांहीं म्हणा परंतु माझ्याच्यानें आतां बिलकूल धीर धरवत नाहीं. मला एकेक क्षण एक एक युगाप्रमाणें जात आहे. (रत्नकांता पुनः मूर्छित पडते.)

चंद्र०— अरे, हें काय पण! सर्व वेळ जर ही अशी मूर्च्छना येऊन पडूं लागली तर एखादे वेळीं वाईट परिणाम घडावयाचा, यासाठीं आपण पुढें जाऊन तिला सावध करून भेटावें. (रत्नकांतेच्याजवळ जातो.)

(रत्नकांतेच्या सख्या चंद्रमुखास पाहून रत्नकांतिकडे आश्रमांत आण्याविषयीं निरोप मागतात.)

रत्न०— प्रियांनों, तुम्ही मला एकटीला अशा विकट अरण्यांत टाकून जाऊं नका.

मंजु॰— अग वेडे, तुला सर्वांस निर्भय करणारा असा मिळाला असतां भलतेंच भय मनांत धरून एकटी म्हणूं नको.

(मंजुळा, वसंतसुंदरी व मधुमोगरी निघून जातात. रत्नकांता लाजून एकीकडे उभी रहाते, आणि आपल्या वामनेत्रानें हळुच राजाकडे टक लावून पहाते.)

चंद्र॰— (रत्नकांतेकडे पाहून) अहाहा! देवा, या माझ्या प्रियेस उत्पन्न करण्यास ब्रम्हदेवाला किती बरें श्रम पडले असतील? या माझ्या प्रियेला पाहिल्यामुळें (डोळ्यांवर हात ठेवून) या नेत्रांचें सार्थक्य झालें. (रत्नकांतेच्या नेत्रांकडे पाहून) कितीतरी हिचें हें नेत्रांनीं बघणें मला मोह पाडीत आहे? (रत्नकांतेस) प्रिये, आतां या ठिकाणीं एकांत वास असल्यामुळें आणि इकडे कोणी दुसरें परकी नसल्यामुळें इच्छित हेतु सिद्धीस नेण्यास हीच संधि योग्य आहे. (असें म्हणून रत्नकांतेस धरण्यास जातो. रत्नकांता त्याचा हात चुकवून एकीकडे होते आणि खालीं मान घालून हळुच राजाकडे पहाते.) प्रिये,

पद.

(नच सुंदरि धरुं कोपा मजवरि धरि॰ या चालीवर.)

नको सखये धरूं शंका ॥ इच्छित तव हाचि सखा ॥
प्रेमानें तव बद्ध मी आहें ॥ दे तूं पूर्ण सुखा ॥ नको॰ ॥ ध्रु॰ ॥
मम हेतू तुजवरती ॥ जाण खरें तूं चित्तीं ॥
लोभाची धरि वृत्ति ॥ ये बैस अंकावरती ॥
चुंबन दे मज प्रीती ॥ सांडुनियां मन भीती ॥ चाल ॥
पूर्ण सुखाचा समय सखे हा दवडुं नको फुका ॥ नको॰ ॥ १ ॥
धरुनीयां करिं मजला ॥ बोल तुं मृदु बोलांला ॥
कुच हे या वक्षाला ॥ लावुनि सुखवीं मजला ॥
साळींच्या कुंकवाला ॥ लागूं दे शेल्याला ॥ चाल ॥
मदनानें प्रिये देहाचा या केलासे भडका ॥ नको॰ ॥ २ ॥

रत्न॰— या वेळीं असें म्हणायाचेंच; पण पुरुषांचें एकदां काम झालें म्हणजे पुढें त्यांस आठवण रहाण्याची पंचाइत पडते.

पद.

(वीरशिरोमणी सकल धनुर्धर॰ या चालीवर)

अंतरगृहिंच्या रतिसुखाला लंपट होउनियां ॥
तुम्हि जाल विसरुनि ही काया ॥ धृ॰ ॥
मन पुरुषांचें कठीण असतें नाहिं दया माया ॥
अभय ही इच्छितसे सदया ॥ चाल ॥
असतील तुम्हाला स्त्रिया कितिक सुंदरा ॥
मग म्हणाल दृष्टिस नको हि मजला जरा ॥
विचार हा तुम्हि करुनियां मनिं पुरा ॥ चाल ॥
लोभ असेल जरि करणें मनिं तरी करावी अचिंत हीजाया ॥
अंतर गृहिंच्या॰ ॥

एकदां नगरास जाऊन तिकडील राजवाड्यांतील विषयसुखांत निमग्न झाल्यावर इकडील आठवणसुद्धां रहाण्याची पंचाइत पडेल.

चंद्र॰— छे छे ! प्रिये, तूं जी मनांत शंका घेतलीस तशी शंका घेण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. कारण;

साकी.

कुमार स्थिति मम आहे सुंदरी योगचि हा गे पहिला ॥
शंका मनिं ही नको धरूं तूं योग्य मि तव लग्नाला ॥
गाढालिंगन दे ॥ हर्षें तुज मज भोगूं दे ॥

(उभयतां एकमेकांस आलिंगन देतात व पल्लव शय्येवर बसतात.)

रत्न॰— प्राणनाथ, इकडे पहा; हा हरीण अगदीं तृषाक्रांत होऊन उदकप्राशनार्थ आपल्याकडे येत आहे. तरी त्यास आपण या पर्णद्रोणांतून उदक प्राशन करवावें.

चंद्र॰— (पर्णद्रोणांत पाणी घेऊन हरीण कुमराच्या तोंडास लावितो. तो मृग राजाकडील पाणी पीत नाहीं. हें पाहून रत्नकांतेस म्हणतो.) प्रिये, पहा हा मृग माझे हातून पाणी पीत नाहीं करितां तूं हा द्रोणा घेऊन त्यास पाणी पाजीव.

रत्न॰— (हातांत उदकाचा द्रोण घेऊन हरीणबाळास पाणी पाजते.)

चंद्र॰— (रत्नकांतेच्या खांद्यावर हात ठेवून) सखे, हा हरीण व तूं दोघें-ही अरण्यांत रहाणारी असल्यामुळें तुझेकडून त्याणें उदक प्राशन केलें. बरोबरच आहे. सजातियांची सजातियांवर प्रीति अस-

तेच.

रत्न० प्राणनाथ, तुम्ही कसेंही म्हणून आपल्या मनाची समजूत करून घ्या पण तुमच्याकडून तर त्याणें उदक घेतलें नाहीं ना? (हंसते) जिवलगा, हा मयूर पहा कसा आपल्या स्त्रियेबरोबर अगदीं निर्लज्ज होऊन नृत्य करीत आहे तो मला वाटतें हा जसा अगदीं वेडाच होऊन गेला आहे तो. महाराज,

पद.

(अर्जुन तर सन्यासी होउनी रैवतकीं बसला या चाली.)

बघुनि तयांच्या नृत्याला मज मदन जाच करी ॥
पुष्पांचा ह्या सुगंध किति हा मद चढवीतो शिरीं ॥
पक्ष्यांचा त्या मंजुळ ध्वनि तो सुख देतो अंतरीं ॥
मृगजळदंव तो भासत मजला सुगंध तेलापरी ॥
मंजुळ मंजुळ शीतळ वायू हृदयीं हर्षभरी ॥
चंद्राचा हा प्रकाश पाहुनी मौजहि वाटे बरी ॥ चाल ॥
हरिणि हरिण हे खेळत नानापरी ॥
हंस स्त्रियांसी भुलविति परोपरी ॥
सुखा छाया कांतेसी करितो हावभाव किति करीं ॥ चाल ॥
दशादीशांतें अवलोकुनियां होतो हर्ष जरी ॥
परि मन्मथ हा बाणें करुनी मज घायाळ करी ॥

चंद्र० खरेंच आहे प्रिये. आणखी पहा ह्या रात्रीची काय गंमत दिसत आहे ती.

पद.

(नच दृष्टिस पडती ते सज्जन उदय. या चाली.)

तप सूर्याचें तेजहि फांके ॥ मुनिच्या शरिराला ॥
तसा हा चंद्र उदय जाहला ॥ धृ० ॥
शरिरांतुनियां प्राण गळाल्या लोपति सर्व कळा ॥
तारांचा विध्वंसचि जाहला ॥ चाल ॥
विरहि जनांला त्रासचि मनिं होतो ॥
कामिकांना आनंद बहु देतो ॥
वसंत ऋतूचा वात सखे हा घमघमीत सुटला ॥

म्हणुनि दे आलिंगन तूं मला ॥ तप०॥१॥

रत्न०— प्राणनाथ, आणखी पहा ह्या रात्रीचा काय चमत्कार दिसतो तो. या तलावांत कमल कसें हालत आहे तें.

पद

(पुष्प पराग सुगंधित शीतल या चालीं०)

किति कमल हें डुलत राहे ॥ अति मौज दिसे नयनिं पहा ॥ ध्रु०
भ्रमर गुंतुनी फजित पावती ॥ शद्ध निघति किति मंद हे ॥
मकरंदास्तव लुब्ध होउनी ॥ वदनिं मिळुनि गुप्त हे ॥
उडति पडति किति दुःख भोगिती ॥ सोडित नाहीं अहा ॥ कि०॥

चंद्र०— वाहवा! प्रिये, तूं जरी हें भाषण अन्योक्तीनें बोललीस तरी त्याचा भावार्थ मी समजलों. सखे, तो तर अज्ञान भ्रमरच आहे. परंतु या विश्वांतील विरही जन विषयीस्त्रीच्या मोहपाशांत सांपडून नेहमीं असेच फजीत पावतात. (चहूंकडे पाहून गडबडीनें) पहा पहा सखे! हा भानूदय होत चालला, बोलण्यांतच भराभर रात्र सरून गेली.

पद.

(प्रिये पहा रात्रीचा समय० या चालीवर.)

सखे पहा शुक्राचा उदय काळ होत चालला ॥ ध्रु०॥
मंद मंद वात सुटत ॥ दाहि दिशा स्वच्छ दिसत ॥
किलकिलाट पक्षि करित ॥ अरुण उदय जहाला ॥ सखे०
पहांटची वेळ शीत ॥ मानसासि सूखवीत ॥
चंद्राचा अस्त होत ॥ सूर्य उदयिं पातला ॥ सखे०॥२॥
विरहि जनां दूखवाया ॥ कामिजनां भूलवाया ॥
हाचि समय तोषवाया ॥ आम्हां प्रिये वाटला ॥ सखेप०॥३

रत्न०— (पाहून) बाबांना प्रातःकाळीं उठण्याबरोबर सकाळचा नमस्कार करण्याची वेळ होत चालली. (उठून उभी रहाते.) प्राणनाथ, आतां आपली भेट या दीन दासीला याउपर कधीं बरें होणार!

चंद्र०— प्राणसखे, सांगतों ऐक. (गळ्यांतील रत्नहार काढून रत्नकंतेच्या गळ्यांत घालतो.) प्रिये

साकी.

रत्नमणी तूं मोजित जाई प्रतिदिनिं एकेक कांते ॥
शेवटच्या दिनिं येतिल मखये मज्जन तुज न्यायातें ॥
चिंता करूं नको ॥ मनिं तूं हुरहुर ठेवुं नको ॥

रत्न॰— बरें आहे प्राणनाथ,

(पडद्यांत)

मजु॰— (मोठ्यानें) सखे रत्नकांते, पहा प्रातःकाळ झाला, बाबांची-स्नानसंध्यादि नैमित्तिक कर्मे आटपलीं; तर लवकर चल.

रत्न॰— (दचकून उठून) काय म्हणते माझी सखी मंजुळा, बाबांची स्नानसंध्या आटपली! (वरती पाहून) आटपली असेल तर काय! हा दिवस स्वच्छ दिसतो. (डोळ्यांतून पाणी काढून व चंद्रमुखास घट्ट आलिंगन देऊन म्हणते.) प्राणनाथ, या अबलेची आपल्याला पूर्ण आठवण असूं दे. आतां या चरणाचें पुनः दर्शन होईपर्यंत ही मला शेवटचीच भेट असें समजलें पाहिजे.

पद.

(मज बहुतचही आशा होति ग वहिनी या चा॰)

आजि शेवटचा योग चि हा पज तुमचा ॥ प्रीया पूर्णदयेचा ॥
बहु सूखविलें इच्छित देउनि मनिंचें ॥ हें प्रेम नावरे साचें ॥
चाल ॥ आतां भेट हि कव्हां होइल हो ॥ मज ॥
जिव कैसा हा मम राहिल हो ॥ जिव ॥
कशि कंठूं मी काळ तरी हा आतां ॥ वाटे ही मनिं चिंता ॥

(रत्नकांता चंद्रमुखाला नमस्कार करून जाते.)

प्रवेश ४.

(मंजुळा व मधु मोगरी प्रवेश करितात.)

मंजु॰— रत्नकांतेच्या नवऱ्यास जाऊन आज बरेच दिवस झाले असें असून त्यांचे कडून रत्नकांतेस बोलावणें कां बरें येत नाहीं! (थांबून) नाना प्रकारचे कुतर्क मनांत येऊन मला बाई मोठी काळजी वाटते.

मधु॰— खरें ग गडे, रत्नकांतेस हा सातवा महिना लागला आतां एकदां तिच्या पतीनें तिला आपल्या घरीं नेलें असतें म्हणजे ठीक झा-

लें असतें.

मंजु०— सखे, काळजी करून तरी काय उपयोग! परमेश्वराचे मनांत आहे तसें घडणार. (आठवलेंसें करून) बाबांनीं पुष्पें आणण्याचें काम सांगितलें या बोलण्यांत आम्ही विसरूनच गेलों तर चल बघूं आपण पुष्पें वेंचण्यास जाऊं. (मंजुळा व मधुमोगरी पुष्पें वेंचतात.)

(पडद्यांत मोठ्यानें)

आश्रमांत कोणी आहे कीं नाहीं! (रत्नकांतेस पाहून) अग रत्नकांते, मी इतका वेळ हांका मार मारून टाळा फोडून घेतला तरी तूं मला न जुमानून माझा उपमर्द केलास काय? चिंता नाहीं. हा घे माझा शाप.

आर्या.

तव कांत रत्नकांते ओंळख नेदी तुला कदापी ती ॥
व्यर्थचि जन्म तुझा हा होउनि दुःखेंहि भोगिशील अती ॥

मंजु०— (ऐकल्यासारखें करून व घाबरून) सखे मधुमोगरे, मोठा घात झाला. पहा कोणी ऋषि रागानें रत्नकांतेस शाप देत आहे.

मधु०— (चकित होऊन) तर मग पहातेस काय गडे, त्वरा कर आणि जाऊन त्या ऋषींचे घट्ट पाय धरून उश्शाप मागून घे.

मंजु०— बरें आहे. (असें म्हणून पडद्यांत जाऊन परत येते.) अग, तो काय सामान्य असला तसला ऋषि नव्हे. महा कोपाग्नीचा खंदक असा जो भोगेंद्र ऋषि तो हा. मी जाऊन त्यांची प्रार्थना करण्याबरोबर माझ्यावर तो एकदम रागावला परंतु नंतर कृपा करून उश्शाप दिला.

मधु०— (आनंदित होऊन) काय काय! कोणता उश्शाप दिला?

मंजु०— अग, त्याणें रत्नकांतेचा नवरा ती पतिगृहीं गेल्यावर तिचा अंगिकार करणार नाहीं असा क्रोधानें शापदेऊन तो पाय आपटीत आपटीत जात होता.

मधु०— (कपाळास हात लावुन) अग बाई! काय दुर्धर कर्म तरी हें! मंजुळे, पण असें असून त्याणें उश्शाप कसा बरें बाई दिला!

मंजु०— गडे, पतीनें आपल्यास बलावणें पाठविलें नाहीं म्हणून आ-मची प्राणसखी रत्नकांता विरहशोकानें पोळून गेल्यामुळें तिला कांहींशी विरहमूर्च्छना आली होती.

मधु०— असें काय! तर मग रत्नकांतेचा यांत कांहीं अपराध नाहीं. बरें तूं गेल्यावर तो काय बोलला!

मंजु०— तो म्हणाला, माझा शाप देवाच्यानें टाळवणार नाहीं. मी म्ह-टलें महाराज, रत्नकांता अज्ञान अबला आहे तिजवर कृपा करून तिजला उश्शाप दिलाच पाहिजे असें म्हणून त्याचे घट्ट पाय धरिले. तेव्हां त्यास दया येऊन मग त्याणें उश्शाप दिला.

मधु०— (आनंदानें मंजुळेस मिठी मारून) सांग सांग कसा उ-श्शाप दिला तें.

मंजु०— तो म्हणाला, प्रथमतः रत्नकांतेचा नवरा जनोपवादासाठीं ति-चा अंगिकार करणार नाहीं; परंतु लोकांचा संशय गेल्यावर तो तिला ओळखील.

मधु०— (प्रफुल्लित अंतःकरणानें) गडे मंजुळे, शाप ऐकून माझी तर बाई पांचावर धारण बसून गेली होती. पण बाई, हें वर्तमान रत्नकांतेच्या कानावर जाऊं देतां कामा नये. जर का हा शाप झाल्या-चें तिला समजेल तर ती तात्काळ प्राणच टाकील. यासाठीं हा प्र-कार गुप्त ठेविला पाहिजे, कारण ती आधींच काळजींत आहे व हें ऐकल्यावर एखादा भलताच प्रकार व्हावयाचा.

वसंत०— (प्रवेश करून मोठ्यानें) गड्यांनों, अग वेड्यासारखें स्वस्थ काय बसलां? अग, बाबा उद्यां प्रातःकाळीं रत्नकांतेची रवानगी क-रून देणार आहे यासाठीं आपलेकडील सर्व तयारी आपणास लव कर केली पाहिजे तर चला बघूं रत्नकांता पुष्पवाटिकेंत बसली आहे तिकडे जाऊं.

मंजु०— (डोळ्यांतून पाणी काढून) रत्नकांतेचा व आमचा इतक्या ल-वकर वियोग होणार म्हणून माझे तर बाई हात पायच गळाले. (हातांतील फुलांची परडी खालीं पडते.) फार वाईट वाटतें पण उ-पाय काय! चला जाऊं.

(मंजुळा, मधुमोगरी व वसंतसुंदरी जातात.)

हेमंत.— (ऋषिशिष्य निद्रेंतून उठून चहूंकडे पहातो.) अहाहा! हा प्रातःकाळचा वेळ मला फारच आनंददीत आहे.

पद.

(मलिन वस्त्र परिधान करितसे. या चालीं.)

समय किती हा हर्षवितो मज देत सूख नयनीं ॥ किती हा.॥
पक्ष्यांचा रव ऐकुनि जातों तल्लिन होऊनी ॥ जातों.॥ धृ.॥ १
थंडगार हा मंजुळ वायू स्पर्शतांचि कर्णी ॥ माझ्या ॥
शीत वाजुनी आंग थरारे रोम उद्भवुनी ॥ आंगीं ॥ २॥
पूर्व दिशा ही लालट झाली अरुणोदय होउनी ॥ झाली ॥
नक्षत्रें हीं लोपलिं गेला चंद्र अस्तमानीं ॥ गेला ॥

(आठवलेंसें करून) मी तर विसरा जबरदस्त बुवा. गुरुजीनीं रत्नकांतेस पतीच्या घरीं पोंचविण्याचें काम मला व शरथाला सांगितलेलें आहे. शरथ आज कोठें बरें निजला असेल! हो हो बरी आठवण झाली. त्यानें मला रात्रीं आपण धेनुशाळेंत निजतों असें सांगितलें होतें. तर आपण धेनु शाळेंत जाऊन शरथास उठवावा. (हेमंत जातो.)

(रत्नकांता, मंजुळा, मधुमोगरी व वसंतसुंदरी पुष्पवटिकेंत बसतात.)

रत्न.— (गहिंवरून) प्रिय सख्यांनों, तुमचा व माझा आतां थोडक्याच वेळांत मला वियोग होणार म्हणून फार वाईट वाटतें.

(मंजुळा आपल्या वस्त्रपल्लवानें तिचे डोळे पुसते.)

मंजु.— गडे, असें करूं नको. पहा आमचें स्त्रियांचें जिणें असल्यामुळें हा एकमेकांचा विरह आमचे कपाळीं जन्मदात्या परमेश्वरानें ठेविलेलाच आहे.

मधु.— (रत्नकांतेस कंवटाळून) अग, तूंजर अशी शोक करूं लागलीस तर कसें बरें होईल? हा विरह मनाला धीर देऊन आपला आपणच कमी केला पाहिजे. गडे, (स्फुंदत) आम्ही तरी आतां तुझ्या पश्चात् दिवस कसे काढावे!

वसंत.— (रत्नकांतेस) अग, अशी इकडे ये, तुझी वेणी घालूं दे; वेळ होत चालला. (वसंतसुंदरी तिची वेणी घालते. व बाकी

स्त्रिया बाजूस बसतात.)

रत्न० — गड्यानों, आतां याउपर तुमची व माझी परमेश्वर केव्हां भेट करवील तेव्हां करो.

पद.

(असतांना यतिसन्निध० या चाली.)

तुम्हांसंगें होतें म्हणुनी त्या पायीं चालतें ॥
परि तुमच्या विरहें माझें भानचिगेहरपतें ॥ चाल
वियोगप्रियांनीं सहावत नाहीं शोक नआवरे मला ॥
वेणिफणिही तुमच्या करिंची अर्पिल कोण मला ॥
हेंचि ग दुःख वाटतें ॥ तुम्हांसंगें० ॥ १ ॥

मंजु० — सखे, तूं पतिगृहीं गेल्यावर देहांतून आत्मा गेल्यावर शरिराची जशी स्थिति होते तद्वत तुझ्यावांचून आमची अवस्था होणार. (ग्रीष्मांबर ऋषिशिष्य सुवर्ण ताटांतून रत्नजडित वस्त्रालंकार घेऊन येतो.) अरे ग्रीष्मांबरा, या आमच्या भिकार आश्रमांत हे वस्त्रालंकार कोठून प्राप्त झाले?

ग्रीष्मां० — मोठाच चमत्कार झाला पहा.

साकी.

अमृतवल्लिनें वस्त्रें दिलिंहीं दूसी आम्रतरूनें ॥
सुवर्णकांतिनें सुंदर नथ ही सर्व हि हे दागीने ॥
लतांनिं दिधले हिला ॥ संतोष व्हाया गुरुजीला ॥

वसंत० — गुरुजींच्या कृपेनें आज काय पाहिजे तें होईल.

मंजु० — सखे मधुमोगरे, मी रत्नकांतेला शालू नेसवितें. हे दागिने तूं घेऊन तिचे अंगावर ठिकाणाचे ठिकाणावर घाल.

मधु० — मंजुके, कुठले दागिने कुठें घालितात हें मला तरी काय माहीत? परंतु मी एकदां बाबां बरोबर रुद्रपुराच्या राजाचे मुलीच्या लग्नासाठीं गेलें होतें तेव्हां तिकडील बायकांनीं घातलेले दागिने मी पाहिले आहेत त्याप्रमाणें घालतें.

(रत्नकांतेच्या सख्या रत्नकांतेस अलंकार घालितात.)

मंजु० — राग भैरवी.

बाई रत्नकांते गे ॥ हुरहूर मनीं डसली गे ॥ बाई० ॥ धृ०

जाशिल सखये पतिगृहाला ॥
भोगिशि सर्वहि पूर्णसुखाला ॥
ऐकूं आम्ही त्या वृत्ताला ॥
परि विरहा न साहवे गे ॥ बाई रत्नकांते गे० ॥ १ ॥

वसंत०— गडे रत्नकांते, तूं गेल्यावर या आश्रमांत रत्नकांते म्हणून कोणाला हांक मारूं?

राग सदर.

तुजविण सखये चैन नसे मज ॥
कोणा सांगूं अंतरिंचें गुज ॥
दशदीशा ह्या शून्य दिसति आज ॥
आलिंगन सुख देई गे ॥ बाई० ॥ २ ॥

मधु०— गडे, माझ्याच्यानें रत्वादे वेळीं पुष्पें आणण्याचें काम होत-नसलें म्हणजे मी चांडाळणीनें माझेबद्दलचें काम तुला सांगत असावें. सखे, त्याचा पश्चात्ताप मला आतां होतो आहे.

राग सदर.

दुःख दिलें तुज स्नेहें करुनी ॥
म्हणुनी वाटे खेद मज मनीं ॥
क्षमा करीं गे मनिं नाणोनी ॥
पूर्ण लोभ असूं दे गे ॥ बाई० ॥ ३ ॥

(भार्गवी प्रवेश करिते.)

भार्गवी— अग पोरींनों, तुम्ही रत्नकांतेची समजूत करावी तें सोडून तुम्हीच रडत बसतां तें काय? वेडया कुठल्या. (रत्नकांतेस कुरवाळून) बये, आतां तूं नवऱ्याचे घरीं जाणार तर आनंद मानावयाचा तें सोडून एकसारखा खेद करीत बसतेस हें काय? खुळी पोरी. (रत्नकांतेचे डोळे पुसते.) अग, असें वारंवार वारंवार डोळ्यांतून पाणी काढीत राहूं नये. मन आवरून विरह कमी केला पाहिजे. आज तुला नवऱ्याचे घरीं जायाचें, कांहीं दिवसांनीं या तुझ्या सख्यांनांही गेलेंच पाहिजे.

रत्न०— आजी ग, तूं म्हणतेस तें सर्व खरें पण माझ्याच्यानें हा

यांचा वियोग मुळींच सहन करवत नाहीं त्यास मी तरी काय करूं ?

भार्गवी:— मंजुळे, चला आतां या रत्नकांतेस घेऊन देवग्रहांत, देवाच्या दर्शनास जाऊं. (सर्वत्र जातात.)

पडदा पडतो.

अंक चवथा समाप्त.

अंक ५.

प्रवेश १.

जांगील ऋषीचे आश्रमांतील देवघर.

जांगील:— पद.

(जाते कीं मम शकुंतला. या चालीवर.)

पाठवितों आज रत्नकांता ती विश्वपुरी नगरा ॥
प्रीतीनें मम हृदय फाटतें कन्या मोह खरा ॥ धृ० ॥
काय विधी तो फांशीं पाडी घालुनी मायनरा ॥
विचारि मी परी नावरे मजला मुलिचा विरह जरा ॥ २॥
षोडश वर्षे पोषिलि तिज मी नावडे प्राण बरा ॥
जाते पतिगृहीं तरि न सोसवे शोका अनिवारा ॥ ३॥

(दुखानें) कन्या रत्नकांता आज आपल्या नवऱ्याच्या घरीं जाणार म्हणून स्नानसंध्यादिक प्रातःकालचीं नैमित्तिक कर्मे जलदी आटपून येण्याविषयीं शरयाला व हेमंताला सांगून ठेविलेंच आहे. तसेंच रत्नकांतेची वेणीफणी करण्याचें काम मंजुळा व मधुमोगरी यांजकडे संपवून दिलें आहे व त्यांस प्रातःकाळाबरोबर होमशाळेंत येण्याविषयीं आज्ञा केलीच आहे; त्याप्रमाणें ते आपापलीं कामें करितीलच. आतां रत्नकांता या कर्दळी वनांत आपल्या सख्यांसह बसलेली आहे तिकडे जाऊं. (जांगील ऋषि कर्दळी वनांत येतात.)

(रत्नकांता, मंजुळा, मधुमोगरी व वसंतसुंदरी जांगील ऋषींस नमस्कार करितात.)

रत्न:— (डोळे पुसीत जांगील ऋषीच्या गळ्यास मिठी मारते. गुरुजी तिला पोटाशीं धरितात.) बाबा, मला आश्रमाला सोडून जाण्यास मन घेत नाहीं, फार वाईट वाटतें.

जांगील:— मुली, याचें कारण असें आहे.

दिंडी.

झालिं वर्षे षोडश तुजला गे ॥ तरुंची या तुज प्रीत जडलि आंगें ॥
आश्रमाचा रीयोग कधीं नाहीं ॥ म्हणुनि वाटे तुज दुःख मुली पाहीं ॥

आणखी तुला वाईट वाटण्याचें कारण सांगतों ऐक.

कामदा.

पक्षि पाळिले बहुत प्रीतिनें ॥
पशुहि रक्षिले ग्रास अर्पणें ॥
नाहिं पाहिलें आपपर कधीं ॥
हाच शोक गे वाटे तुज अर्थीं ॥

(रत्नकांतेची आई गौतमी प्रवेश करिते.)

रत्न०— आई ग, मी तुला नमस्कार करितें.

गौत०— अखंड पतिसौख्य भोगून अष्टपुत्री होशील.

पद.

(नाहिं झाले षण्मास मला० या चाली.)

रक्षियली गर्भि तुला कष्ट भोगुनी ॥
वाढविली अज्ञपणें दूध अर्पुनी ॥ रक्षि० ॥ धृ० ॥
कैशि तरी साहुं आतां विरह मी हिचा ॥
नावरेचि मोह मला रत्नकांतेचा ॥
हट्टि म्हणुनि ताडिलें तो डाग हृदयिंचा ॥
आठवतें किं मन्मनीं ॥ रक्षियली० ॥१॥
एक दिनीं रागें करुनी भक्षिना कण्या ॥
म्हणुनि त्यांणिं पोटिं धरुनि समजवलि प्रिया ॥
कन्येविणें आश्रमांत दुःख बहुत या ॥
खेद क्षणोक्षणीं ॥ रक्षि० ॥ २ ॥

रत्न०— आई, तुझा व माझा आतां वियोग होणारच ना?

गौत०— (रत्नकांतेच्या गळ्यास मिठी मारून) बाळे,

पद.

(गजानना दे दर्शन सत्वर या चाली.)

तुजवरि मी हा प्राण ठेविला ॥ दिसती दीशा शून्यचि मजला ॥
कधिं नाहीं तव अंतर पडला ॥ प्रसंग हा पहिला ॥ धृ० ॥१
न सोसवे मज तव विरहाला ॥ परि गे आतां भोगचि आला ॥
जाणेंसे तुज पतिगृहाला ॥ यत्नचि हा खुंटला ॥ तुज० ॥२॥
पतिगृहींच्या पूर्णसुखाला ॥ घेशि कडेवर तूं लेंकराला ॥

पाहिन तेव्हां सुख नेत्रांला ॥ तोंवरि हुरहुर उरला ॥ तुज०॥३

(गौतमी आपल्या वस्त्रानें रत्नकांतेचें डोळे पुसते.)

रत्न॰— आई गे, मी आजपर्यंत तुझ्यावाचून एक दिवससुद्धां भोजन-केलें नाहीं तसेंच तूं जर कधीं तरी शेजारचे घरीं गेलीस तर येई-तोंपर्यंत माझे नेत्र तुझ्या येण्याच्या वाटेकडे गुंतून रहात अस-त. मला आज सोळा वर्षांत तुझा एक क्षणाचा वियोग कसला तो ठाऊक नाहीं, अशी मी इतके दूर अनोळखी देशांत काळ कसा-घालवूं.

अंजनीगीत.

दुःख दिलें तुज नानापरी ॥ ताडिलें माते अज्ञानपणीं ॥
भोजन केलें तुज घेवोनी ॥ आनंदें बहु मी ॥१॥
तुजविण आई नगमे मजला ॥ अंतर तूं मज कधिं ना दिधला
आतां मी गे अनाथ अबला ॥ झालें तुजवीणें ॥ २॥
भेटूं दे मज तुज कडकडुनी ॥ घे अंकावर मज लागोनी ॥
चुंबन दे मज प्रीति करोनी ॥ शेवटचें मातें ॥ ३॥

गौत॰— मुली, छे छे असें अमंगळ बोलूं नये. तूं नवऱ्याचे घरीं जाणार करितां प्रफुल्लित मुद्रेनें रहा.

रत्न॰— आई, तूं सांगतेस तें सर्व खरें व माझे हिताचें आहे हें मला समजतें परंतु हा आश्रमाचा वियोग माझ्यानें सहन कर-वत नाहीं त्यास मी तरी काय करूं?

जांगी॰— बाळे रत्नकांते, आतां खेद कमी कर, गमनमुहूर्ताची वेळ होत चालली. दिवस पहा किती वर आला तो. अरे हे शरथ आणि हेमंत करतात काय?

(हे शरथ व हेमंत प्रवेश करतात.)

जांगी॰— मुलांनो, तुम्ही अजूनपर्यंत काय करीत होतां?

शरथ॰— गुरु महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें होमशाळेंतील सर्व त-यारी करून तसेच इकडे आलों.

जांगी॰— ठीक आहे. मुली रत्नकांते, चल बघूं आतां होमशाळेकडे जा-ऊं. (सर्वत्र होमशाळेकडे जातात.)

होमशाळा.

रत्न०— प्रीय गड्यानों, तुम्ही सर्वत्र मिळून मला एकदम घट्ट आलिंगन द्या.

मंजु०— सखे, तूं पतिसदनीं जाऊन तिकडील राजविलास भोग भोगूं लागल्यावर या दीनसखीची तुला आठवण तरी होईल काय ग?

रत्न०— असें कसें बरें होईल?

श्लोक.

स्थिति नच कधीं आत्म्यावीणें शरिरा तेजि नसे ॥
मुळ न असतां वृक्षालागीं उभा न रहातसे ॥
जिवन नसतां मीनालागीं मृत्युच येतसे ॥
तशिच गति गे तुम्हावीणें मजही होतसे ॥

मंजु०— सखे, तूं ही आपल्या गळ्यांतील रत्नमाळा फार जपून ठेव; कारण तुझ्या नवऱ्यानें तुला ही प्रीतीनें दिली आहे. आणि तूं पतिसदनीं गेल्यावर जर तुला नवऱ्यानें ओळख दिली नाहीं तर तूं ही रत्नमाळा त्यास दाखीव; मग तो तुला लागलाच ओळखील.

रत्न०— (घाबरून) मंजुळे, अग तुझ्या या सांगण्यानें माझ्या बाई काळजाचें पाणीच होऊन गेलें.

मंजु०— अग वेडे, भारी बाई अळकुवी ही. यांत बाई वाईट वाटण्याचें कारण नाहीं; परंतु ते थोर लोक असल्यामुळें कदाचित् जर त्यांस विस्मरण पडून तसा प्रसंग आला तर तुला सुचवून ठेवलें.

रत्न०— बरें आहे. मी ही रत्नमाळा माझ्या जिवापलिकडे सांभाळून ठेवीन.

मधु०— गडे, तूं नवऱ्याचे घरीं प्रथमच जात आहेस तेव्हां तिकडील लोकांची तुला ओळख नसल्यामुळें कांहीं दिवस अवघड वाटणार यासाठीं तिकडील मनुष्यांची चांगली ओळखदेख होईपर्यंत फार जपून मर्यादेनें व सुशिक्षितपणानें राहिलें पाहिजे. आपल्याबरोबरच्या स्त्रियांशीं बोलायाचें असलें तर आसपास कोणी वडील घारें माणूस आहे कीं नाहीं हें पाहून बोलावें व तें फार हळु बोलावें.

मंजु०— सखे, तूं बसलेली असलीस आणि तुझी सासू व नणंद वगैरे कोणीही वडील माणूस आलें तर लागलेंच उठून उभें रहावें-

बसून असूं नये.

वसंत०— प्रियसखे, सासू, आऊ, नणंद, सासरा यांनीं जर कोणतें-ही काम करण्यास सांगितलें तर एकदम करावें; व तें काम असें करावें कीं त्याला कोणीही दूषण देऊं नये.

मधु०— तुला तुझा नवरा जर एखादे वेळीं रागें भरला तर त्यांचें बोलणें निमूटपणें सोसून घेत जा. त्यांना उलट उत्तर अगदीं देऊं नको यांतच तुझें कल्याण होईल.

रत्न०— प्रियगड्यांनों, ज्या ज्या प्रमाणें वागण्यास तुम्ही मला सुचविलेत त्याहीपेक्षां चांगल्या रीतीनें मी सासरीं वर्तणूक ठेवीन. पण तुम्ही मला अंतरणार त्या वेळाची आठवण मला झाली - म्हणजे माझ्या बाई पोटांत कालवतें.

मधु०— गडे, स्नेहाच्या अंतीं पुष्कळ वेळां माझेकडून तुझे अनेक अपराध घडले आहेत, त्याबद्दल मनांत कांहीं एक न आणतां माझ्या वरती लोभ ठेव.

पद.

(शैवाल्यें युक्त जैसें पंकज. या चालीं.)

परिसावें रत्नकांते मम वचना स्पष्ट तें ॥
दूखविलें तूज परि गे मनिं आतां नाणिं तें ॥
नेणुनि मी बोलिलें तें मज भारी जाचतें ॥
हा अन्याय माफ करुनी देइं क्षमा तूं मातें ॥ परि० ॥

रत्न०— बायांनों, तुमचेकडून तर मला कधींही काडी इतका त्रास पोंचला नाहीं परंतु मी मात्र तुम्हास पदोपदीं ताडून बोलत होतें त्याचाच मला पश्चात्ताप होऊन वाईट वाटतें.

वसंत०— गडे, आम्ही ज्या वेळीं बाहुल्यांचें लग्न केलें होतें त्या वेळीं - त्या लग्नांत मी तुझी वेण झालें होतें. तेव्हां मी वरपक्षाच्या नात्यानें तुला भिकारी वगैरे शब्दांनीं खोंचून बोललें त्या वेळीं तूं रडून निघून गेलीस. त्या दिवसाची मला आतां आठवण होऊन माझें काळीज तुटत आहे.

पद.

(तुज दिलें दुःख मी म्हणुनी. या चालीं.)

ताडियलें तुज वाग्बाणीं ॥ तो प्रसंग मनिं तूं नाणीं ॥
बोलिलें तुज रवोंचूनी ॥ परि क्षमा करीं मम भगिनी ॥
आजि झालों हतभागीणी ॥ आम्हि दीन तुजवांचोनी ॥
ही तव भगिनी हात जोडोनी ॥ मागे आलिंगन कडकडुनी ॥

(सर्व सख्या रत्नकांतेस आलिंगितात.)

जांगी॰— मुलींनो, आटपा आतां बघा किती उशीर होत चालला तो!

शरथ॰— गुरुजी, पहा दिवस चार घटकांवर आला, ऊन होत चाललें.

रत्न॰— बाबा, शेवटीं तुम्ही मला इतके लवकर अंतरणार ना!

जांगी॰— बाळे, तुला कधीं तरी नवऱ्याचे घरीं गेलेंच पाहिजे. आतां तूं मजपासून आजपर्यंत कधीं दूर गेलीस नाहीं म्हणून तुला असें वाटतें. पण तूं आपल्या पतीच्या घरीं जाऊन पतीकडील राजलक्ष्मी भोगूं लागलीस म्हणजे तुला वाईट वाटणार नाहीं.

पद.

(जेव्हां जेव्हां वादायातें या चाली.)

मुलि तूं मिळशी पति अंकाला ॥ पावशि साज्या पूर्ण सुखाला ॥
तोंवरि तुज हा हुरहुर उरला ॥ नको करूं खंती ॥ १ ॥
मजसन्निध आजी असलिस तूं जरी ॥ जाणें पतिगृहीं तुज केव्हांतरी
दुःखें गाळिशी नयनिं किति परी ॥ नेत्र तुझे सुजले ॥ २ ॥

रत्न॰— (सद्गदित होऊन) बाबा, मी आपल्या सेवेला पुनः या आश्रमांत केव्हां येईन!

जांगी॰— (रत्नकांतेच्या मस्तकावर हस्त ठेवून)

साकी.

पुत्ररत्न मुलि घेऊनि अंकीं पतिला तूं संगातें ॥
द्वादश वर्षें भरण्यापूर्वीं येशिल भेटायातें ॥
सुखि अस मम बाळे ॥ पुरविल ईश तुझे चाळे ॥

रत्न॰— सख्यांनो, आतां मला तुम्ही शेवटचें एकदम कडकडून आलिंगन द्या. (रत्नकांता सर्वत्रांस आलिंगन देते.)

पद.

(गंगा नदि नी सागर या चाली.)

अंतर तुमचा न सोसवे मज काळिज तडतडतें ॥

लोभानें मम हृदय फाडुनी मन बहु हुरहुरतें ॥ धृ०॥१॥
मानियलें मज भगिनी परि तुम्हीं तें मज आठवतें ॥
दुःख दिलें तुम्हां असेल तरि गे क्षमाहि मी मागतें ॥ २॥
कळवावें मज घडेल इकडे जें जें सर्वहि तें ॥
तसेंच प्रियांनीं वृत्तहि कळवा तुम्हि जाल पतिगृहिं तें ॥ ३॥

शारथः— महाराज, दिवस फार वर आला.

जांगीः— मुलीनों, चला आतां वेळ राहिली नाहीं. बाळे रत्नकांते, नवऱ्याचे घरीं गेल्यावर कोणत्या प्रकारें वर्तणूक ठेविली पाहिजे हें तूं अज्ञान असल्यामुळें तुला ठाऊक नाहीं म्हणून मी सांगतें ऐकून घे. आम्ही जरी अरण्यांत रहाणारे असलों तरी प्रसंगोपात अनुभवानें आम्हास समजतें.

शारथः— (मान हालवून) महाराज, आपणास ठाऊक नाहीं असा पदार्थ भूतळावर मुळींच नाहीं. आपण सर्वनियंते आहां, आपणास सर्व कांहीं समजतें.

जांगीः— मुली,

पद.

(बाडवडीलां सेवित जावें या चालीवर.)

पतिसेवेसी रमत असावें ॥ श्वशूर वचन जिंकित जावें ॥
धवभगिनीचें कार्य करावें ॥ सेवकजनिं तूं सदय पहावें ॥
कठीण वचन मनिं नाणावें ॥ नम्रपणानें वर्तत रहावें ॥
विपत्तिकाळीं धैर्य धरावें ॥ संपत्तिजोरें गर्विष्ट नसावें ॥
ऐशा स्त्रियेसी कुलीन म्हणती ॥ इतरांचा सारे धीःकार करिती ॥ १

रत्नः— आपलें वचन मी सदोदित हृदयकमळीं ठेवीन.

गौतः— मुली, आणखी मी तुला सासरीं कोणत्या रीतीनें वागलें पाहिजे तें सांगतें हें ध्यानांत ठेव.

दिंडी.

सासुवचनीं तूं चित्त धरित जावें ॥
सर्व भूतांवरि प्रेम मनिं असावें ॥
पतिव्रतेचा धर्म हाचि पाहें ॥
कांतसेवा ही योग्य तुला आहे ॥

रत्न०— आई ग, मी तुझी कन्या आहें तेव्हां तुझी चरणकृपा असली म्हणजे माझे हातून अनीति कधींही होणार नाहीं.

जांगी०— (आपणांतच) कन्या रत्नकांता आज नवऱ्याचे घरीं जात आहे तर तिच्या पतीस निरोप काय बरें सांगून पाठवावा (विचार करून) आपाखी काय निरोप सांगून पाठवावयाचा. (शारथाला) शरथा, तूं रत्नकांतेस घेऊन राजाकडे गेलास म्हणजे राजाला असें सांग.

पद.

(वस्त्रानें देह सारा० या चालीं०)

कन्या ही पोषिली मी आजवरती प्रीतीनें ॥
नावडती मजलागीं इजहूनी इंधनें ॥
न कळत तूं आम्हा कोणा वरिली ही आवडिनें ॥
परि त्याचा रोष नाहीं केला योग त्या विधिनें ॥ कन्या०

शारथ— आज्ञा महाराज.

जांगी०— आणखी राजास असें सांग.

चाल सदर.

अरण्यांत रहाणारी मम बाळी सर्वदा ॥
अंतर हा कधिंच नाहीं मुलिं न कळे मर्यादा ॥
जाणसि तूं सर्व राजा परि वाटे हृद्‌ग्दा ॥
म्हणुनीयां प्रार्थितों मी हिस ठेवीं त्वत्पदा ॥ अर०॥

शारथ— (नम्रपणानें) सांगतों महाराज.

जांगी०— चला आतां ही गंगानदी जवळ आली. आजचें मुक्काम जरा दूरचें आहे.

(सर्वत्र चालूं लागतात.)

रत्न०— बाबा, माझे आंगावर हा जलवर्षाव कशाचा झाला?

जांगील:— अहाहा! मुली काय चमत्कार सांगूं! आज आपल्यास तूं अंतरलीस म्हणून हे सर्व वृक्ष झोकें करून दुःखें गाळीत आहेत. तसेंच हे तरू तुला आलिंगन देण्यासाठीं शाखारूपी आपले हस्त खालीं करून तुझ्या आलिंगन सुखाची भेट घेऊं इच्छित आहेत. तर लवकर जाऊन त्यांस आलिंगन दे, आणि

निरोप घेऊन त्यांचें दुःख कमी कर.

रत्न०— (वरती हात करून) हे माझ्या वृक्षबंधूनों, मी माझ्या प्रिया-च्या भेटीसाठीं सासरीं जात आहे. बाबा व माझ्या सख्या तुम-चें माझ्याही पेक्षां जास्त प्रतिपालन करितील.

शार्दूल.

मित्रा आम्रतरू तुला नमित मी लोभा असूं दे सदा ॥
च्यूता तूजविणें मला प्रिय नसे आत्माहि तो सर्वदा ॥
प्रेमा हा तुमचा मदीय हृदयीं कोंडोनियां बैसला ॥
येतें मी परिसा सुखी तुम्हि असा भेटी अतां द्या मला ॥

(रत्नकांता सर्व वृक्षांस जाऊन भेटते.)

मंजु०— सखे, ह्या लता पहा तुझ्याकडे येण्यासाठीं कशा फुरफुरता-हेत त्या. त्यांसही जाऊन भेट.

रत्न०— (लतांस कुरवाळते.) गडे मंजुळे, ही कस्तुरी वेल मी म-हा प्रयत्नानें मिळवून सख्या बहिणीपेक्षांही हिचें जास्त प्रति-पालन करून हिला वाढविली आहे. या कस्तुरी वेलीला पुष्पें आलीं म्हणजे मला तें वर्तमान कोणाहीकडून कळविशील-ना! आणि सखे, या जाईस पाणी आठवणीनें घालीत जा, विसरूं नको कारण हिला पाणी घालण्यास वेळ लागला तर ही लागलीच अगदीं म्लान होऊन जाते.

(मधुमोगरी रत्नकांतेच्या कंठास मिठी मारते.)

मधु०— सखे, तूं इकडील कसलीच काळजी बाळगूं नको. तूंच आप-ल्या नवऱ्याबरोबर आनंदभोग भोगून सुखी असल्याचें वर्तमा-न वेळोवेळीं कळवीत जा.

वसंत०— गडे रत्नकांते, इकडे - पाहिलेंस काय तुझ्या डाव्या आंगा-स काय चमत्कार घडला तो. त्या सेवंतीनें आपलीं पुष्पें तुला पाहण्याबरोबर खालीं टांकलीं तीं. तीं फुलें घेऊन तूं आपल्या मस्तकावर माळ.

(रत्नकांता फुलें घेऊन मस्तकावर खोंविते.)

शरथ०— गुरु महाराज, आपण बोलतां बोलतां या गंगा नदीपर्यंत आलों. स्वजनाला जलाशयापर्यंत पोंचवावें असें आम्हाला आ

पणाच एक दिवशीं पाठाचे वेळीं सांगितलेवरून आपणास सूचवि-तों.

रत्न०— (दुःखित होऊन) बाबा, मंजुळा वगैरे सर्व इकडूनच परतणार काय!

जांगी०— मुली, तुझेबरोबर भार्गवी आजी येईल. तुझ्या सख्यांना तुझे बरोबर येतां येत नाहीं. त्यांचीं अजून लग्नें व्हावयाचीं आहेत.

रत्न०— माझ्या प्रियसख्यांनों, मी जरी अखंड पतिसुख भोगण्यासाठीं सासरीं जात आहें तरी तुमच्या वियोगापुढें तें सुख मला तुच्छ वाटतें.

शरथ— गुरु महाराज, रत्नकांतेस विरहशोक अनिवार झाल्यामुळें ती कांहीं तुम्हांस जाऊं देणार नाहीं यासाठीं आपणच मागें परताल तर बरें होईल. असें मला वाटतें.

जांगी०— (रत्नकांतेच्या मस्तकावर हस्त ठेवून)

साकी.

जशि दुष्यंता शकुंतला तशि हो तूं पतिला पुज्य ॥
चक्रवर्ति सुत पावुनि अंतीं देठनि पुत्रा राज्य ॥
येई मम वाचे ॥ भोगिशि सर्वहि तूं सोहळे ॥

(रत्नकांता, शरथ, हेमंत व भार्गवी विश्वपुरास जातात.)

जांगी०— (गौतमीस) अग, आतां रडून काय करतेस! दुसऱ्याचें धन काय आपल्याकडे ठेवावयाचें नाहीं. रत्नकांता आपल्या सासरीं गेली फार चांगलें झालें, आतां आम्ही मोकळीं झालीं. (रत्नकांतेच्या सख्यांस) मुलींनों, चला आतां आश्रमास जाऊं. तुम्ही आतां येथें कितीही वेळ जरी उभीं राहिलां तरी तुमची सखी कांहीं तुमच्या नजरेस पडणार नाहीं, ती डोंगरा आड दूर गेली.

साकी.

प्रियसखि तुमची रत्नकांता ती गेली विश्वपुराला ॥
शोक तुम्हि हा टाका मुलिंनों जिव हा बहु हुरहुरला ॥
पावलि दूर अतां ॥ तुमची मैत्रिण मम दुहिता ॥

मंजु०— बाबा, रत्नकांते वांचून हा आश्रम माझ्याच्यानें पहावत सु- द्धां नाहीं.

पद.

(आजि शेवटचा लाभचि हा ममतेचा या चालीं.)

मज पहावतही नाहीं आश्रम आतां ॥
वाटे मनिं बहु चिंता ॥
तपशाळा ही शुन्यचि दिसते ताता ॥
दीशा उदास पहातां ॥ चाल ॥
मज कोठें करमत नाहींहो ॥ मज ॥
आजि थारा न दिसे कांहींहो ॥ आजि ॥
कशि काढूं मी काळ तरी हा आतां ॥
जिव हा तळमळ होतां ॥ मज पहावत० ॥

जांगी०— मुलींनों, तुमचा व तिचा अप्रतिम प्रेमा असल्यामुळें तु- म्हाला कांहीं दिवस असेंच वाटावयाचें.

वसंत०— (गौतमीस) आई ग,

राग भैरवी.

गेली रत्नकांता ती ॥ झाली मज बहु खंती ॥ गेली० ॥ धृ०
रत्नकांतेविणें चैन पडेना ॥ मन माझें हें कोठें रमेना ॥
तपोवन मजला मुळिं पहावेना ॥ जडला लोभ अती ॥ गेली०

गौत०— मुलींनों, तुम्हालाच वाईट वाटतें असें नाहीं. पहा ह्या लता तसेच वृक्ष, पशु व पक्षी आदिकरून सर्वत्रांस रत्नकांता आ- श्रमांतून गेल्याचें वाईट वाटल्याकारणानें ते सुद्धां अगदीं म्ला- न होऊन गेले आहेत.

जांगी०— चला आतां आपापल्या कामाला. माझाही माध्यान्हका- ळच्या स्नानसंध्येचा वेळ झाला.

(जांगील ऋषि, गौतमी व रत्नकांतेच्या सख्या जातात.)

प्रवेश २.

विश्वपूर नगरच्या राजवाड्यांतील मोठा दिवाणखाना.

(पुरोहित, चंद्रमुख, सेवक व विदुषक प्रवेश करितो.)

चंद्र०— गुरुजी, वडिलांनीं सर्व राज्यकारभार माझ्याकडे संपवून दिला असल्यामुळें मला राज्यपद्धति समजावून घेणें जरूर आहे.

साकी-

गुरुजी आपुला शिष्य मी आहें सांगा मजला रीत ॥
राज्यपद्धती कथुनी शीरीं ठेवा आपुला हस्त ॥
कराविं पूर्ण दया ॥ राज्यीं नरकहा भय या ॥

पुरो०— राजा, तूं योग्य वेळीं उत्तम प्रश्न केलास म्हणून मी आनंदानें राज्यपद्धति पूर्वी व्यासानें धर्मराजास कथन केली त्याप्रमाणेंच मी तुला सांगतों.

चंद्र०— सांगावी महाराज. मी ऐकण्यास चकोराप्रमाणें तयार आहें.

पुरो०— ऐकून घे.

साकी-

प्रजा सर्व त्या निज पुत्रापरि मानी तूं रे राजा ॥
परकामिनि त्या मातृ भगिनि मुलि ऐशा समजत तूं जा ॥
मग तूं पावसि रे ॥ स्वर्गादिक सुख सारें ॥

चंद्र०— आज्ञा महाराज.

पुरो०— आणखी सांगतों ऐक.

दिंडी.

तीर्थवाशांसी मार्गि सूख व्हाया ॥
धर्मशाळाही बहुत असों याव्या ॥
अन्नसत्रांची पूर्ति करित जावी ॥
पाणपोयांची योजना असावी ॥

चंद्र०— गुरुजी, आपल्या आज्ञेप्रमाणें वर्तन ठेवण्यास मी कमती करणार नाहीं.

पुरो०— पुनः सांगतों श्रवण कर.

कामदा.

अतित्त येतित्यां द्रव्य अर्पुनी ॥ सुजन रक्षिं तूं दुष्टांपासुनी ॥
मांडलिक भुपां संकटांत रे ॥ करुनि साह्य वा येश घेइं रे ॥

राजदूत.— (प्रवेश करून आपणांत) जांगील ऋषी कडून आणलेला निरोप हे मंतानें महाराजांचे कानावर घालण्यासाठीं मला-

पाठविलें आहे. हा ऋषिशिष्याचा निरोप महाराजांस लवकर जाऊन कळविला पाहिजे. (चंद्रमुखाजवळ येतो.) महाराज, हा मेघदूत चरणीं प्रणिपात करितो.

चंद्र०— अरे कां आलास!

मेघ०— कोणी ऋषिशिष्य बाहेर आलेले आहेत, त्यांचेबरोबर दोघी स्त्रिया आहेत त्यांत एक वृद्ध व एक तरुण आहे. ते वसंतारण्यांतून जांगील यानांवाचे ऋषीकडून आपल्यास निरोप घेऊन आलों आहों असें सांगत आहेत आज्ञा होईल तर आंत घेऊन येतों.

चंद्र०— (आपणांत) महाऋषि जांगील सद्गुरूकडून काय बरें निरोप आला असावा! (मेघदुतास) त्यांस सत्वर आंत घेऊन ये.

मेघ०— बरें आहे सरकार.

चंद्र०— (आपणांत) सद्गुरूकडून शिष्य येण्याचें कारण काय समजत नाहीं.

(शारथ, हेमंत, भार्गवी व रत्नकांता प्रवेश करितात.)

हेमंत— मित्रा शारथा, ही राजवाड्याची रचना पाहून मला मोठा अचंबा वाटतो.

शारथ— तुला विषयी जनांचा सहवास मुळींच नसल्यामुळें असें वाटतें.

चंद्र०— (शारथ व हेमंतास) महाराज, हा चंद्रमुख आपल्यास नमस्कार करितो.

शारथवहेमंत— राजा, तुझें इच्छित परमेश्वर पूर्ण करील.

चंद्र०— आपली कृपा असली तर आम्हास काळाचीसुद्धां भीति वाटणार नाहीं. पण तीच आपली अवकृपा झाली तर आमचा तात्काळ नाश होईल. महाराज, मुनिश्रेष्ठ जांगील ऋषि खुशाल आहेत ना! व त्यांचीं तपादिक वेदोक्त कर्मे निर्विघ्न चाललीं आहेत ना!

शारथ— राजा, विचारतोस काय! तुझ्या सद्वर्तनानें या तुझ्या राज्यांतून विघ्नें दूर पळून गेलीं.

चंद्र०— महाराज, आपल्याबरोबर ही सकुमार व तरुण स्त्री इकडे कां आली? व हिचें नांव काय हें कृपा करून सांगावें. (आपणांत) या स्त्रियेचें येण्याचें कारण काय असावें? या सुंदरीनें आपलें सर्वांग लज्जारक्षणासाठीं जरी झांकून घेतलें आहे तरी ही अतिरूपवती आहे यांत संशय नाहीं. आज माझा उजवा नेत्र कां बरें स्फुरण पावत आहे? (रत्नकांतेस न्याहाळून) या कमलाक्षीचा मला फारच लोभ वाटतो काय असेल तें असो.

पद.

(नाथ कैसे गजको फंद छुडायो. या चालीं.)

किति मज दिसतो लोभ इयेचा ॥ नयनीं न दिसे जरी देह स्त्रियेचा ॥
वस्त्रें छपे अति लावण्य जीचें ॥ धृ० ॥ किति मज० ॥
ऋषिकुमरांच्या संगेंही आली ॥ छपत लपत ही राहे ॥
परि ही मोहक मजला पाहे ॥ कारण अजुनी समजत नाहीं ॥
कवण देश वस्तिचा ॥ किति मज० ॥

शरथ:— राजा, कां रे असा संशयांतसा पडलास?

चंद्र०— महाराज, शंका तर कांहींच नाहीं परंतु आपल्या बरोबर जी ही स्त्री आहे तिला इकडे येण्याचें प्रयोजन काय घडलें? याच संशयांत मी आहें, बाकी कांहीं नाहीं.

रत्न०— (हलुच) या यांच्या बोलण्यावरून यांना पूर्व कृत्याची आठवणच नाहीं असें वाटतें. (छातीवर हात ठेवून) मना, इतक्यावरूनच तूं उतावळी होऊन गडबडूं नको पुढें काय संभाषण होतें तें ऐकून घे.

शरथ:— राजा, तूं पूर्वी कधीं जांगील गुरुजींच्या आश्रमास आला होतास काय?

चंद्र०— मला कांहीं आठवत नाहीं.

शरथ:— नीट विचार कर.

चंद्र०— मला हे स्पष्ट विचारतात यावरून कांहीं तरी मजबद्दलचेंच हें प्रकरण असावें. (शरथास) मुनिश्रेष्ठांनों, मी पूर्णपणें विचार केला परंतु मी पूर्वी जांगील ऋषीचे आश्रमास गेल्याचें मला कांहीं आठवत नाहीं.

शरथ:— अरे, पूर्वी वसंतारण्यांत दीर्घनेत्र या नांवचा राक्षस मदोन्मत्त झाल्यामुळें तूं त्याचे नाशार्थ वसंतारण्यांत गेल्याचें तरी तुला स्मरतें काय?

चंद्र०— (थांबून) आतां माझी खात्री झालीच; हें आमचेंच लचांड आहे. (शरथास) होय मी दीर्घनेत्राचा नाश केल्याचें मला आठवतें. (आपणांत) मी ज्या स्त्रियेशीं वसंतारण्यांत स्नेह केला तीच ही स्त्री अशी माझी पूर्ण खात्री झाली. परंतु ही माझी स्त्री आहे असें जर मी कबूल करीन तर सगळ्या जगांत माझा दुर्लौकिक होणार आहे. यासाठीं ही आपली स्त्री असें मुळींच कबूल करूं नये म्हणजे झालें.

शरथ:— राजा, सांगतों नीट ऐकून घे. असा भ्रमिष्टासारखा भ्रमांत पडूं नको. तुला जांगील गुरूनें असा निरोप सांगितला आहे कीं तूं आपल्यास नकळत हिचा प्रीतीनें अंगिकार केलास तरी विधीच्या कृतीवर लक्ष्य देऊन आपणासही ती गोष्ट मान्य झाली. या रत्नकांतेला (रत्नकांतेस हातास धरून) तुझेपासून गर्भ राहिला आहे म्हणून ही तुझी स्त्री तुझ्या स्वाधीन करण्यासाठीं गुरूनें आमच्याबरोबर देऊन पाठविली आहे. ही तुझी स्त्री तूं आपल्या स्वाधीन करून अर्धांगीं घे. कारण

साकी.

उपवर कन्या माहेरिं असतां जनदोषातें पावे ॥
म्हणुनि स्त्री ही स्वकरीं घेउनि दूषण मुक्त करावें ॥
तुज हें योग्य असे ॥ गुरुला भूषण वाटतसे ॥

रत्न०— अरे कर्मा! अजूनही यांची मुद्रा चलबिचल दिसते. यावरून अद्यापिही यांचा संशय गेला नाहींसा वाटतो. प्रारब्ध माझें त्यास दुसऱ्याकडे काय बोल! (कपाळावर हात मारिते.)

चंद्र०— काय म्हणतां मी जांगील ऋषीच्या कन्येशीं शरीरसंबंध केला! ही माझ्यावरती निवळ तोहमत्त आहे.

शरथ:— राजा, दूरवर विचार कर. तूं हिचा स्विकार केला नाहींस!

चंद्र०— होय तर काय! असेंच मुनिवर्य.

शरथ— (रागानें) अरे मूर्ख राजा, या मुलीला खोटें बोलणें कधीं स्वप्नांतसुद्धां ठाऊक नाहीं असें असून तूं कर्म करून छपविण्यासाठीं अबला स्त्रीचा घात करूं पहातोस काय? चांडाळा, अज्ञानें तुला नरकयातनाच भोगावी लागेल.

चंद्र०— महाराज, आपण असे कोपाविष्ट होऊं नका, जरा स्थीर व्हा. माझे हातून असें कुकर्म होईल असें आपल्यास वाटतें काय?

शरथ— यांत काय संशय!

पद.

(वाह्वा थोर तूं भूपाळा या चालीं०)

भला तूं निर्दय चांडाळा॥ कांरे फसविलिही अबळा॥ध्रु०
रत्नकांता ही गुतवुनि फांशीं घातचि रे केला॥
फसवुनि मोहुनि झडप घालुनी केला इजवर घाला॥भला०॥
जांगिल गुरुचा मान भंगुनी अपमानिसि तूं त्याला॥
मानव नससी घातकि होसी राक्षसवत मज गमला॥भला०

रत्न०— व्यर्थ मी फसून सुगुणी मनुष्य असें समजून या राक्षसाचे तोंडांत पडलें. हरहर परमेश्वरा! मला तोंड दाखविण्यासुद्धां जागा ठेविलीस नाहीं ना?

भार्गवी— बये, आतां तूं लज्जा जरा एकीकडे ठेव आणि तूंच यांची खात्री कर.

रत्न०— प्राणनाथ, (जीभ चावलीसें करून) ज्याणें आपली ओळखसुद्धां छपविली तेव्हां अशा पुरुषास एकदम असें म्हणणें बरोबर नाहीं. महाराज, आपण पूर्वीं आमच्या आश्रमांत असतांना पुष्पांचा तुरा माझे पाठीवर मारिला तेव्हां मी आपल्यास थट्टेनें असें म्हटलें कीं बायकांस मारण्याची सवय चांगली नव्हे. तें तरी आपणास आठवतें काय?

चंद्र०— "स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं, देवोनजानाति कुतोमनुष्यः" या श्लोकाच्या पहिल्या चरणाचा उपयोग ही स्त्री मला करून दाखविण्यास पहाते आहे. (रत्नकांतेस) कपिलाइके, अशा तुझ्या मोहक भाषणांनीं कामानें व्यास असलेले पुरुष वश्य

होतील. मी तसा वश्य होऊन पातकाला साधन करून घेणारा नव्हे.

शारथ.— (रत्नकांतेस ढकलून) वांडगे पोरी, वडील माणसांचे विचारावांचून आपसंतपणानें केलेल्या कृत्याचें फळ भोग आतां. (पुनः ढकलतो.)

रत्न०— (थरथर कांपते. कपाळावर हात मारून) अरे चांडाळा दैवा! काय माझी पाठ पुरविलीस ही! (चंद्रमुखास) हे सज्जना, माझ्या अबलेच्या असा विश्वास घात करणें आपल्यासारख्या थोरांस योग्य नव्हे. हे देवा! शेवटीं मीं स्वछंदाचरणी झालें ना? महाराज, आपल्या हातची जर कांहीं खूण दाखविली तर त्यावरून तरी आपली खात्री होईल काय?

चंद्र०— हो हो, ही तोड तर फारच उत्तम आहे.

रत्न०— (आपणांत) माझ्या सखीनें जी रत्नमाळा सांभाळून ठेवण्याविषयीं सांगितली होती ती याकरतांच. माझ्या सखीचे मजवरती अनंत उपकार आहेत. (रत्नकांता गळ्यांत रत्नमाळा पहाते. व गळ्यांत रत्नमाळा नाहींसी पाहून रडूं लागते.) हाय हाय! रे कर्मा, कोणा कोणात्या रीतीनें तरी तूं माझी पाठ पुरविलीस! परमेश्वरा, माझे गळ्यांतील रत्नमाळासुद्धां अशा आणीबाणीच्या प्रसंगीं नाहींसी केलीस ना!

भार्ग०— मुली, ती वाटेंत कोठें तरी तुटून पडली असावी.

विदु०— (आपणांतच) वाहवा रे वाहवा! आमचे महाराज तर बुवा पक्के कावेबाज, रवाशांच्या मुद्रेकडे पाहिलें म्हणजे बेट्याच्या मनाचा प्रकार भलताच झाल्याचें दिसतें. बरें बोलण्यांत तरी राजश्रीनें कशी धरसोड धरसोड चालविली आहे, वस्ताद खरे बुवा. (उघड) कसें काय मित्रा, तूं तरी असा अलभ्य लाभ कां दवडतोस?

चंद्र०— चल बेड्या, तुला काय आपलें सर्व पैशानेंशेर.

विदु०— अरे, मी तुला पूर्ण ओळखतों. मला तुझीं सर्व कर्में ठाऊक आहेत, पण मी कशाला या वेळीं बोलून दाखवितों, आपोआप बाहेर पडतील. तूर्त चालूं द्या तुमचें झगडें, आम्हांस—

मौज तरी पहावयास मिळेल

रत्न० — देवा कायरे तूं हा माझा पिच्छा पुरविला आहेस!

चंद्र० — स्त्रियांचें चरित्र जें म्हणतात त्याचा हा साक्षात् अनुभव पहा. ही स्त्री अनेक प्रकारच्या कल्पना लढवून मला फसवून नरकांत घालण्यास पहाते.

विदु० — मित्रा, आतां मात्र सर्व लोकांची खात्री झाली कीं, तुझ्या हातून हें कृत्य घडलें नाहीं म्हणून पण हें चांगलें नव्हे हो.

रत्न० — हाय हाय, देवा!

पद.

(मजवरील सुभद्रा कायहा चाली.)

माझ्या प्राक्तनिं ऐसें काय ॥ लिहिलें विधिनें हो ॥ ध्रु०॥
नकळे मजला असत्य भाव ॥ परि हा दूषण देतो राव ॥
आतां ठेवूं मि कैसा जीव ॥ देवा धांव संकटिं या ॥ मा०॥१
म्हणतिल जन मज व्यभिचारी ॥ देतिल दूषण नानापरी ॥
खातें हेंचि रे अंतरीं ॥ जिव आशा मज नाहीं ॥ मा०॥२॥

नारायणा! आतां मी कायरे करूं! (रडूं लागते.) (चंद्र मुखास) राजेंद्रा मज अनाथाचा जाणूनबुजून असा विश्वास घात करूं नको. उभय लोकांस अंतरावें लागेल यासाठीं नीट विचार कर.

चंद्र० — जी गोष्ट मुळींच घडली नाहीं त्याजबद्दलचा विचार करण्याचें कारणच नाहीं.

रत्न० — हर हर! परमेश्वरा, फुकट रे मी या खाटिकाच्या नादीं लागून फसलें!

पद.

(मी कुमार तिहि कुमारी असतां, याचाली.)

फसलें मी वचनिं यांचे हरिणी ती जैशि जाळीं ॥
पावलें दीर्घ शोका दुःखाग्नी मजला जाळी ॥
व्याघ्राच्या वदनिं गाई तसि माझी गति हि झाली ॥
चाल ॥ वदनांत अमृत ज्याचे ॥ बाहेर वीषचि सांचे ॥
कुत्सीतपण तें मनींचें ॥ करुनि झाली मम होळी ॥
चाल ॥ फसवुनी मजला आतां ॥ होतो हा आपण परता ॥

चंद्र०— हे स्त्रिये, निरर्थक परकी पुरुषाच्या गळीं पडून त्याला दूषण देण्यांत कांहीं अर्थ नाहीं, व अज्ञानें म्हणजे तुझी कार्यसिद्धि तडीस नाईल असें मुळींच समजूं नको.

रत्न०— (रागानें लाल होऊन) हे कठोर हृदयाच्या घातकी पुरुषा, विचार कर. पूर्वी रामचंद्रांनीं सीतेला लोकोपवादासाठीं अरण्यांत नेऊन सोडल्या पातकानें रामाचे राज्यांत द्वादश वर्षें पर्यंत पर्जन्य न पडून रामाची प्रजा अन्नान्न करूं लागली शेवटीं जेव्हां पाऊस न पडण्याचें कारण गुरु वसिष्ठांनीं रामास सांगितलें तेव्हां रामास महा पश्चात्ताप झाला. त्याहून माझा अनाथाचा विश्वासघात केल्यानें तुला जास्त दुःख भोगावें लागेल.

चंद्र०— (आपणांत) ही सांगते तें सर्व खरें आहे आतां येथें काय करावें ! जर हिचा अंगिकार करावा तर सर्व जन असें म्हणणार-कीं, अति लावण्ययुक्त स्त्री पाहून राजा मोहित झाला आणि त्याणें ही परकी स्त्री आपली म्हटली. बरें जर हिचा स्विकार न करावा तर ही म्हणते त्याप्रमाणें मला दुःखें भोगावीं लागतील यांत संशय नाहीं. (थांबून) देवा, तूंच हिच्या संकटास पाहून व माझ्याकडे बघून खरा निर्णय करून मला दोषमुक्त कर. (रत्नकांतेकडे पाहून) काय तरी हिचा हा कोप, हिच्या नेत्रांकडे पाहिलें म्हणजे मला असें वाटतें कीं, ही आपल्या नयनांतील कोपाग्नीनें शंकरांनीं जसा मदनाचा नाश करून सोडला तशी ही माझी अवस्था करते कीं काय कोण जाणे. हिणें आपल्या त्या धनुष्याकृति भोंवया कमानीसारख्या लववून वर नेल्या आहेत मला वाटतें त्या धनुष्याच्या बाणांनीं माझें हृद्‌द भेदून मला मूर्छित पाडील. (आपणांत)

(चाल कानडी राग भूप.)

पहांताचि इस मला भीति वाटते ॥ धृ०॥
गरगर नेत्र फिरवितांहे ॥ भ्रुकुटिवक्र चढवितांहे ॥
आंग थर थर कांपतांहे ॥ लाल जाहली ॥ पहा०॥१॥
शब्दबाण कठिण घोर ॥ टोंचिति अंतरासि फार ॥
आतां मज न धरवे धीर ॥ प्रिया हीरवरी ॥२॥

राक्षवत मानि मला ॥ योग्य न म्हणे मानवाला ॥
विश्वास घात खचितझाला ॥ जाणुनी पुरा ॥ पद्मा०॥ ३

पुरो०— चंद्रमुखा, हिच्या ह्या सर्व कोपाकडे पाहिलें म्हणजे तुझ्यावरती तुफान घेते असें हिच्या चालचलणुकीवरून दिसत नाहीं. मलाबाटतें सर्व प्रकार खरा असावा, परंतु तुला त्या कृत्याची आठवण नाहीं. चंद्रमुखा, मला एक युक्ति सुचली आहे.

चंद्र०— गुरु महाराज, आपणच मला हिच्या कोपाग्नीच्या भडाक्यांतून व जनोपवादांतून सोडवावें.

पुरो०— (रत्नकांतेस.) हे मुली, मी तुला सांगतों तें ऐकशील ना?

रत्न०— महाराज, आपणच माझे आतां या ठिकाणीं आप्त आहां. मी आपलीच कन्या आहें असें समजून माझें कल्याण करा.

पुरो०— मुली, देवऋषि नारद स्वामीची स्तुति कर. त्याला त्रैलोक्यांत घडलेल्या गोष्टीचें ज्ञान असतें. ते तूं स्तवन केल्यावर येऊन या गोष्टीचा निर्णय करितील.

रत्न०— आपल्या आज्ञे प्रमाणें जगद्गुरु नारद स्वामींचा धांवा करतें. जर त्यांस माझी करुणा येऊन त्यांणी माझे संकटास पावून माझें दुःख दूर केलें तर बरें झालें, नाहींपेक्षां हा प्राण येथेंच ठेवीन.

चंद्र०— आहा: हीच तोड चांगली आहे.

रत्न०— (हात जोडून)

पद-

(चालत काशीस नृपवर० या चाली०)

मुनिवरश्रेष्ठा धांव वेगिं तूं ॥ धृ०॥
संकट हें मजवरती पडलें ॥ नभची आंगावर कोसळलें ॥
प्राणहि माझे कंठिं उरले ॥ चरण मजलादाव ॥ वेगिं तूं०॥ १॥
दशवदनाचा घात करीशी ॥ गृहांसि त्या तूं युक्ति सुचविशी ॥
रामाच्या साहाकारी होशी ॥ नकळे तूझी माव ॥ वेगिं तूं०॥ २॥
चित्ररेखेसि मंत्र सांगुनी ॥ सुदर्शनासी आण घालुनी ॥
उशेसि त्या अनिरुद्ध देउनी ॥ पुरविलि तीची हांव ॥ वेगिं तूं०॥ ३
जारकर्म हें मजवर येतें ॥ पितृकुळासी दूषण घडतें ॥

मजला हें बहु दुःख वाटतें ॥ तुजवरि माझा भाव ॥ वेगिंतूं ॥ ४

(नारद प्रवेश करितात.)

पद.

(पावना वामना या मना. या चालीं.)

जाउंया गाउंया पाहुंया त्या क्षिरसागरि सदोदित वासिया ॥ धृ०
जो श्रीवल्लभ मनरंजन ॥ योग्य संकटिं ताराया ॥ जाउंया ॥ १ ॥
निळकंठ निरंतर गाइ तो ॥ धांवे खळांसि माराया ॥ जाउं० ॥ २
प्रीय जिवाहुनि भक्त ज्या ॥ नेई शेवटिं पादिं त्या ॥ जाउंया ॥ ३

नारद:— अहाहा! या सृष्टींतील मनोवेधक देखावे पाहून मनाला फार फार आनंद होतो, आणि या भूतळावरील नारायणानें केलेल्या सृष्टीक्रमास बघून ईश्वराच्या मायेविषयीं अंत कोणासही लागत नाहीं याची खात्री होते.

चंद्र०— देवऋषे नारदस्वामी हा दीन चंद्रमुख आपल्यास वंदन करितो आहे.

नारद:— (मस्तकावर हस्त ठेवून) चंद्रमुखा, तुझें इच्छित परमेश्वर पूर्ण करो.

रत्न०— स्वामी महाराज, ही अनाथ गरीब रत्नकांता आपल्या चरणीं नमस्कार करिते.

नारद:— (हंसत)

दिंडी.

अष्टपुत्री तूं होइं रत्नकांते ॥ पतिप्रीतीही पूर्ण भोगुं तूतें ॥
विरह तुजला कधिंहि नाघडों दे ॥ अखंड सौभाग्य तूजला असूं दे

पुरो:— मुनिवर्य, ही महाऋषि जांगील गुरूची कन्या, कांहीं दिवसांमागें चंद्रमुख ऋषिआश्रमास गेला होता तेव्हां हिचा व त्याचा शरीरसंबंध घडला, आणि चंद्रमुखापासून हिला गर्भ राहिला असल्यावरून ऋषींनीं इकडे पाठविली आहे. राजा चंद्रमुख तर आपली वहिची मुळींच ओळख नाहीं असें म्हणतो म्हणून याबद्दल खुलासा आपणाकडून व्हावा.

नारद:— चंद्रमुखा

दिंडी.

धर्मपत्नी ही तूझी चंद्रमूरवा ॥ घेइं अंकावर देइं सर्वसूरवा ॥
दोषनाहीं इजकडे तिळहिकांहीं ॥ ब्रम्हदेवाची करणिसर्वपाहीं ॥

(प्रधान व कोतवाल प्रवेश करितात.)

प्रधानः— सरकार वंदन करितों.

चंद्र०— प्रधानजी इतक्या गडबडीनें कां येणें झालें?

प्रधानः— महाराज कोतवालाकडून जरूरीचें प्रकरण आतांच आलें आहे त्याचा प्रकार असा. ही आपल्या गळ्यांतील रत्नमाळा (रत्नमाळा चंद्रमुरवाचे हातांत देतो.) कोणा एका वाटसरू मनुष्यास मिळाल्यावरून त्याणें ती कोतवालाकडे हजर केली. ही रत्नमाळा व कोतवालास घेऊन मी इकडे आलों, व त्या मनुष्यास चावडीवर ठेविला आहे.

चंद्र०— प्रधानजी ज्या मनुष्यानें इमानें इतबारें पापभीति बाळगून रत्नमाळा आणून दिली त्यास कैदेंत ठेवण्याचें कारण नाहीं. त्या मनुष्यास बक्षिस देऊन त्याची रवानगी करून द्या.

(प्रधान व कोतवाल निघून जातात.)

नारदः— चंद्रमुरवा, माझ्या देरवत या रत्नकांतेचा तूं स्वीकार करून आपल्या वामांकावर घे.

चंद्र०— (नारद आज्ञेप्रमाणें रत्नकांतेस आपले डावे मांडीवर बसवितो.)

रत्न०— (चंद्रमुरवाच्या गळ्यास मिठी मारून) प्राणनाथ, ज्या वेळीं आपण माझा अंगिकार करीनात त्या वेळीं आपल्यास दारवविण्यासाठीं मी माझ्या गळ्यांत शोधीत होतें तीच ही रत्नमाळा. हिचा मोठाच चमत्कार वाटतो.

पद.

(दिसलि पुनरपी गुम झाली. या चाली.)

कंठांतुनि मम गळुनि हि गेली रत्नमाळा ती कशी तरी ॥
विसर तुम्हासी पडुनी माझी गाळण झाली किति कपरी ॥ धृ०
शरिर योग हा मनिं आणीतां विचार होतो ममांतरीं ॥
विधिची करणी विचित्र आहे थांग नलागे शिवाहरी ॥ कं० ॥

पहा प्राणनाथ, शेवटीं हिणें किती मजा करून सोडिली ती.

मिळुनि शेवटीं योग्य वेळिं हा प्रसंग टळला अति घोरी ॥

स्वामिनिं मजवर कृपाकरुनियांराखिलि माझी कीर्ति ब-
री ॥ कंठा०॥ ३॥

पुरो०— (नारद स्वामीस) मुनिश्रेष्ठ, हा सर्व प्रकार खरा असतांना अ-
सें होण्याचें कारण काय?

नारद:— विप्रोत्तमा, सांगतों ऐक.

साकी.

दिला शाप भोगेंद्र ऋषीनें नोळखे पति म्हणवोनी ॥
विधि लिहुनी तरि ऐसेंचठेवी भोगणें इस जाणोनी ॥
झाला ऐसा हा ॥ घडला प्रकार तूं पाहा ॥

एके दिवशीं ही रत्नकांता पतीकडून बोलावणें यावयाचें तें आलें नाहीं
म्हणून मोठ्या काळजींत होती.

पुरो० बरोबरच आहे, स्त्रियांना यापरती आणखी काळजी ती कसली अ-
सणार?

नारद:— हिला नवऱ्याचें बोलावणें न आल्या कारणानें कांहींसी मू-
र्च्छना आली.

चंद्र०— हाय हाय! किती माझा अधमपणा हा! जिणें आपलें तन, मन,
धन सर्व मला अर्पण करून माझ्यासाठीं जिवापलिकडचे कष्ट सो-
सले अशा प्रकारच्या या माझ्या प्रियेला मी दुष्टानें व्यर्थ त्रास दि-
ला.

पुरो०— ही मूर्च्छना येऊन पडल्यावर काय झालें?

नारद:— त्या कोपिष्ठ भोगेंद्र ऋषीची स्वारी फिरत फिरत ज्या ठिकाणीं
रत्नकांता मूर्च्छित पडली होती त्या ठिकाणीं आली.

पुरो०— नंतर.

नारद:— ऋषि, आश्रमांत कोणी नाहीं असें पाहून जाऊं लागला. जातां
जातां त्याणें रत्नकांतेस पाहून रागानें लाल झाला.

पुरो०— जबरदस्त रागीट खरा.

नारद:— पुढें रत्नकांतेनें आपल्यास गर्वानें उत्तर दिलें नाहीं म्हणून त्या-
णें रत्नकांतेस तुझा पति तूं सासरीं जाशील त्यावेळीं अंगिकार
करणार नाहीं असा शाप देऊन एकदम चालता झाला.

पुरो०— शाप दिल्यावर मग?

नारद:— इतक्यांत हिची सखी तेथें आली आणि हा त्याचा शाप ऐकून फार घाबरली.

रत्न०— हाय ग बाई! किती तरी माझ्या सखीचे मजवर उपकार हे!

नारद:— हिच्या सखीनें जाऊन त्या ऋषीचे घट्ट पाय धरले आणि उश्शाप मागून घेतला.

रत्न०— तरच माझ्या मंजुळा सखीनें मला इकडे येते वेळीं ही रत्नमाळ फार जपून ठेवण्यास सांगितली होती ती.

पुरो०— भोगेंद्र ऋषीनें काय उश्शाप दिला?

नारद:— जनोपवादासाठीं लज्जेनें चंद्रमुख हिचा प्रथमतः अंगिकार करणार नाहीं परंतु लोकांचा संशय फिटल्यावर तो हिचा अंगिकार करील.

विदु०— वाहवा रे मित्रा! तूं तरी भला ठक दिसतोस. गृहस्था, जाणून बुजून तूं या स्त्रीला रडवायाला लावलेंस त्या तुला म्हणावें तरी काय?

चंद्र०— गड्या, मी जर प्रियेचा प्रथमच अंगिकार केला असता तर जनदोषाला पात्र झालों असतों; आतां कांहीं हरकत नाहीं.

नारद:— (रत्नकांतेस) मुली, तुझे मनोरथ पूर्ण झाले ना?

रत्न०— स्वामी महाराज, आपल्या चरणाच्या कृपेनें झाले.

नारद:— आतां मी येतों, माझा माध्यान्हिक स्नानसंध्येचा वेळ होत चालला.

पद.

(राधाधर मधुमिलिंद. या चालीं.)

सदानंद सुखकंद श्रीधर ॥ रमारमण गुरु गोविंद ॥
जय गोविंद ॥ ध्रु० ॥
दुःखांचा करि अंत दयाघन ॥ चित्सुख परमानंद ॥
जयजय रमारमण गुरु गोविंद ॥ जय गोविंद ॥ १ ॥
अतीत मानस भृंग अखिलजन ॥ तारक तोचि मुकुंद ॥
जयजय रमा० ॥ २ ॥
रासक्रीडारतरंग भरित जो ॥ गोपीहृद्गत छंद ॥
जय जय रमा० ॥ ३ ॥

(नारद निघून जातो.)

चंद्र०— प्रिये, जाणून बुजून लोकलज्जेसाठीं मी तुझा धिक्कार केला याबद्दल मला फार वाईट वाटतें.

रत्न०— प्राणनाथ, आपल्याकडे याचा कांहींच दोष नाहीं; हा सर्व प्रकार माझेच नशिबानें घडविला. मात्र आपल्यास त्या रागाचे वेळीं नाना तऱ्हेनें ताडून भाषणें केलीं याबद्दल मी आपल्या चरणाकडे माफी मागतें. प्राणनाथ,

पद.

(सकल जगीं सारखे बंधू. या चालीं.)

फुकट दुःख दिलें मी तुम्हाला ॥ नेणुनि हा प्रमाद बहु घडला ॥ धृ०
शाप मुनीचा नकळे मजला ॥ अनर्थ किति हा झाला ॥ फुकट० ॥
नानापरि मी ताडियलें हो ॥ बोलुनियां बोलांला ॥ फुकट० ॥ २ ॥

आणखी महाराज,

साकी.

राक्षस उपमा देउनि तुमच्या दुखविलें मी चित्ता ॥
तें मज प्रीया बहुत जाचतें विसरा सारें आतां ॥
विनवी चरणासी ॥ तुमची अंकित ही दासी ॥

चंद्र०— प्रिये, तूं असें कांहीं मनांत आणूं नको. कारण,

साकी.

विधिकरणीचा अंत नलागे सखये कधिं शेषाला ॥
म्हणुनि प्रिये तूं मनिं हें नाणीं होतें जें कर्माला ॥
आलें घडुनी तें ॥ आतां अदुखी अस कांते ॥

पुरो०— बाळे रत्नकांते, बाळा चंद्रमुखा, तुम्ही उभयतां एकमेकांला योग्य अशा तुमच्या गांठी पडल्या, हें दुधांत साखर पडल्याप्रमाणें फार चांगलें झालें. आतां तुम्ही वडील मातोश्रीच्या दर्शनास चला.

(सर्व जातात.)

प्रवेश २.

राजा शौर्यसागर, सुशिलाबाई, रतिप्रिया, प्रधान व सेवक.

देवघरासमोरील मोठा दिवाणखाना.

शौर्य॰— (सुशिलाबाईस) प्रिये, प्रधानजीनें आतांच येऊन काय सांगितलें समजलें काय!

सुशि॰— प्राणनाथ, आम्हा बायकांना राजदरबारच्या गोष्टी कोठून समजणार!

शौर्य॰— चारुगात्रे, बाळक चंद्रमुख वसंतारण्यांत दीर्घनेत्र राक्षसाच्या नाशास गेला होता. तेथें त्यानें त्या अरण्यांतील जांगील ऋषीची कन्या रत्नकांता हिच्याशीं लग्न लाविलें.

रति॰— खरेंच काय बाबा, बाळा चंद्रमुखानें आपलें लग्न लावून घेतलें!

शौर्य॰— मग पुढें ऐकून तरी घे. त्या रत्नकांतेस चंद्रमुखापासून गर्भ राहिल्यामुळें आजच तिच्या बापानें तिला इकडे पाठवून दिली. चंद्रमुखानें हें कृत्य आमच्या भिडेमुळें आजपर्यंत गुप्त ठेविलें परंतु मुनिश्रेष्ठ नारद ऋषींनीं रत्नकांतेच्या संकटास पावून हा सर्व ब्रम्हदेवाचा खेळ आहे अशी उभयतांची समजूत करून निघून गेले. आतां चंद्रमुख आपल्या पत्नीसह इकडे येणार आहे.

सुशि॰— प्राणनाथ, चंद्रमुखानें स्वसंतोषानें जर विवाह केला तर ती गोष्ट मला तर फार उत्तम वाटते. (रतिप्रियेस) काय गताई, तुझ्या चित्तास कसें येतें!

रति॰— आकाबाई, तुमच्या पसंतीस जी गोष्ट आली तीच मला मनापासून आवडली. कारण तुम्ही जरी मोठ्या कुळांतील राजकन्येशीं त्याचें लग्न लावून दिलें असतें, आणि ती स्त्री त्याला नावडती झाली असती तर त्यांत कांहीं अर्थ साधला नसता. त्यापेक्षां आपण होऊन त्यानें आपल्या योग्य स्त्री मिळविली यांत कांहीं वाईट नाहीं.

सुशि॰— प्राणनाथ, चंद्रमुखानें मोठमोठ्या सुंदर राजकन्या सोडून मुनिकन्येशीं लग्न केलें तेव्हां ती स्त्री फार सुंदर असून गुणवान् असेल यांत संशय नाहीं.

(चंद्रमुख, रत्नकांता, शरय, हेमंत, भार्गवी व पुरोहित प्रवेश करितात)

चंद्र०— (रत्नकांतेस) प्रिये, चल बघूं आतां आपल्या सासूसासऱ्यांच्या भेटीस माझ्याबरोबर.

रत्न०— प्राणनाथ, वडील माणसांसमोर जायाला मला हाई मोठी लाज वाटते.

भार्गवी.— मुली, प्रथमतः अशीच लाज वाटावयाची.

विदु०— (प्रवेश करून आपणांत) बघावें आतां या आनंदसिंधूस आमची या वेळीं आठवण तरी होते काय! नाहींपेक्षां खानेकु मैं आणि लढनेकू मेरा बडा भाई. तद्वत जंगलांतील त्रासाचीं कामें असलीं म्हणजे मित्रा चल आज इकडे जाऊं, उद्यां तिकडे जाऊं; । बरें त्या अरण्यांत खाण्यापिण्याच्या नांवानें भोंपळ्याएवढें पुज्य. असो पाहूं आतां या चैनीचे वेळीं आमची याला आठवण होते तर. एरवादे वेळीं ही थोरांचीं कार्टीं प्रसंगीं विसरून जाऊन आमच्या हातावर तुरी देण्यास कमती करणार नाहींत. (असें म्हणून गुडघ्यावर हात टेंकून स्वस्थ बसतो.)

चंद्र०— (विदुषकाकडे पाहून) अहाहा! काय आमचे हे मित्र वक्रदंत बुवा विचित्र मुद्रेनें बसलेले आहेत. राजश्रीला वक्रदंत हें नांव उत्कृष्ट शोभतें. (विदुषकाजवळ जातो.) मित्रा, अरे मित्रा,

विदु०— काय रे बाबा, कुठें अरण्यांत विरण्यांत जायाचें आहे काय! तुझें काय बाबा! तुला मिळालेली आहे ती भटाची पोरगी, मला कशाला ओळखशील! (त्रासून) गड्या, माझा जीव अगदीं मरणाला आलेला आहे; मला आतां जरा स्वस्थ बसूं दे. माझा जीव खाऊं नको.

चंद्र०— मित्रा रागावूं नको. बाबांच्या भेटीला जायाचें, तूंही मजबरोबर चल.

पुरो०— (रत्नकांतेस शौर्यसागराकडे बोट करून) मुली, हे पहा तुझे श्वशूर, यांस आधीं नमस्कार कर. (सुशिलाबाई व रतिप्रियेकडे बोट करून) ही तुझी वडील सासू व ही तुझी धाकटी सासू, यांना नमस्कार कर. (रत्नकांता त्याप्रमाणें नमस्कार करिते.)

शौर्य०— बाळे रत्नकांते,

तूज वर तूं योग्य निवडिला गे ॥
म्हणुनि आनंद बहुत मनीं वागे ॥
पुत्रलाभातें त्वरित पावशील॥
चक्रवर्ति गुणवान आणि सुशील ॥

सुशी०— (आनंदीत मुद्रेनें) मुली, अशी जवळ ये. (रत्नकांतेस जवळ घेऊन बसविते.)

पद.

(तुज दिलें दुःख मी० या चाली.)

जहाले क्लेश तुज बाई ॥ तो दुःखाग्नी मज खाई ॥
आठवतें तें यासमयीं ॥ मम काळिज भडभड होई ॥
धरुं नको तें तूं हृदयीं ॥ मन रोषा टाकुन देई ॥
सुन बाई, विधिच्या पायीं ॥ घडला भोग अगाई ॥

रति०— (रत्नकांतेस कुरवाळून) तुला माहेरून इकडेस येई तों पर्यंत मार्गांत नाना तऱ्हेचे कष्ट भोगावे लागले असतील.

रत्न०— सासूबाई, मला मार्गांत व इथें जीं दुःखें भोगावीं लागलीं त्या दुःखांचें तुमच्या दर्शनानें पाणीच होऊन गेलें.

शौर्य०— बाळा चंद्रमुखा, तूं आपण होऊन आपल्या योग्य स्त्री केलीस त्याजबद्दल मला फार आनंद झाला. (चंद्रमुखास जवळ बसवितो.)

पद.

(वाटे सर्वदा मुक्त झालों० या चाली.)

मुला अर्पिलें राज्य तुजला ॥ धृ० ॥
आजवरि पाळिली ॥ प्रितिनें हि रक्षिली ॥
ती प्रजा रक्षण ह्या भार शिरीं वाहिला ॥ मुला० ॥ १ ॥

चंद्र०— बाबा, गुरुप्रसादें करून व आपल्या आशीर्वादें करून मजकडून अन्याय घडणार नाहींत.

शूरथ०— (शौर्यसागरास) राजा,

साकी.

भगिनीवत मम रत्नकांता ही घातलि पदरीं तुमच्या ॥
प्रीतीं ।हस पाळणा करुनी देवा योग हि मुलीचा ॥

चेतों आम्हि आतां ॥ जातों आश्रमासि पहातां ॥

शौर्य:— श्रेष्ठांनो,

पद.

(समज पर गडबा. या चाली.)

आपुला आत्मा ॥ रक्षण करण्यासी ॥ सांगणें नलगे कवणासी
तरीही तुमची ॥ भगिनी आम्हासी ॥ निश्चयें समजावी मानसीं
टाकुनि द्या शंका ॥ घडल्या गोष्टीची ॥ आठव नठेविं चित्तासी ॥
मागणें हेंची ॥ माझें चरणाशीं ॥ सद्गुरु जांगिल गुरुपाशीं ॥

शरथ:— राजा, परमेश्वरानें ज्या ज्या वेळी जें जें प्रारब्धांत लिहिलें आहे त्या प्रमाणें सर्व गोष्टी घडून येणार. अरे, फार काय सांगूं! ईश्वराच्या सत्तेवांचून झाडाचें पानसुद्धां हालणार नाहीं.

शौर्य:— आपण सर्वनियंते असल्यामुळें आमच्याकडून घडून आलेल्या अपराधांची माफी कराल अशी आशा आहे.

शरथ:— राजा, आम्ही आमची गुरुभगिनी रत्नकांता तुझ्या पदरांत घातली आहे हिचें तूं आपल्या पोटच्या मुली प्रमाणें संरक्षण केलेंस म्हणजे झालें. अरे राजा, तूं धर्मनीतीनें वागलास म्हणजे स्वर्गसुख हात जोडून तुझ्यापुढें उभें राहील.

हेमंत:— (रत्नकांतेस) बाबांनीं आम्हास तुला तुझे पतीचे स्वाधीन करून लवकर परत येण्याविषयीं आज्ञा केल्याप्रमाणें तुला तुझे पतीचे स्वाधीन केली. आतां आम्हीं आपल्यास आश्रमास जातों.

रत्न:— शरथ दादा, मी जरी इकडे या वेळीं सुखांत आहें तरी तुम्हीं इकडून गेल्यावर मी एकटीनें या अनोळखी जागेंत कसें बरें रहावें! यासाठीं माझी इकडील मनुष्यांशीं चांगली ओळख व मनाला मन मिळे तोंपर्यंत कांहीं दिवस तुम्ही इकडे असा. दादा, एवढें माझें सांगणें तुम्ही ऐकलेंच पाहिजे. (रडूं लागते.)

शरथ:—

साकी.

किति गे रडशिल रडुनी रडुनी नेत्र तुझे हे सुजले ॥
घळघळ वहानी अश्रु अवयव सर्व तुझे गे भिजले ॥